रुपयांचीं अत्तरें खरेदी केलीं. त्यानंतर ते स्नानास निघून गेले. ते स्नानाहून परत येत आहेत तों महाराज आणि अत्तरवाला यांच्यांत कांहीं संभाषण चाललेलें त्यांना ऐकूं आलें. अत्तरवाला म्हणाला, 'मी नमुनासुद्धां कुणाला कधीं फुकट देत नाहीं. पैसे द्या, आणि मी आपल्याला अत्तराचा फाया देईन. माझीं अत्तरें कांहीं आठ दहा आणे तोळा किंमतीचीं नाहींत. मी एका फायाचे आठ आणे घेतों.' महाराज त्यावर म्हणाले, 'मी गरीब मनुष्य आहें. माझ्या हाताला थोडें अत्तर लावा. मला अत्तराचा फाया नको. मला हिना आणि मोगरा दाखवा.'

तरीसुद्धां अत्तरवाला नमुना दाखविना. नंतर श्रीसासवडकरांनीं त्याला महाराजांना नमुना दाखविण्यास सांगितलें. महाराज कांहींतरी चमत्कार करतील असा त्यांचा तर्क होता. म्हणून त्यांनीं त्याला पुन्हां आग्रह केला. आणि म्हटलें, 'त्यांना नमुना दाखवा ते तुमची अत्तरें घेतील.'

परंतु अत्तरवालाहि मोठा हट्टी दिसला. तो गर्विष्ठपणानें म्हणाला, 'माझीं अत्तरें भारी किंमतीचीं आहेत. ते तीं काय घेणार?' तथापि त्यानें दोन नमुन्याचीं अत्तरें महाराजांच्या हाताला लाविलीं. महाराजांनीं त्या अत्तरांच्या किंमती विचारल्या, तेव्हां तो म्हणाला, 'माझीं अत्तरें दहा रुपये तोळ्याचीं आहेत; परंतु त्यांना दिलीं त्याप्रमाणें आठ रुपये तोळा देईन.' महारांजांनीं नंतर अत्तराचा वास घेतला. आणि म्हणाले, 'ह्या वास तर आम्ही घरांत स्वयंपाकांत फोडणीला तेल वापरतों त्या तेलाच्या वासासारखा आहे. अत्तरवाल्याला घुस्सा आला. तो अद्वातद्वा बोलूं लागला. श्री सासवडकर म्हणाले, 'कांहीं लोकांना अत्तराची पारख नसते तशी तुला मनुष्याची पारख नाहीं.'

महाराज नंतर त्यांच्याकडे वळून म्हणाले, 'भाऊसाहेब, त्याला पांच रुपये द्या, आणि सर्व अत्तरांचे नमुने दाखविण्यास सांगा,' त्याप्रमाणें अत्तरवाल्यानें त्याच्याजवळ असलेल्या सर्व अत्तरांचे नमुने दाखविले, परंतु त्यानें दाखविलेल्या सर्व अत्तरांचा वास साध्या तेलाच्या वाईट वासाप्रमाणें आला. अगदी भारी किंमतीच्या अत्तरांचीही तीच वाट झाली. अत्तरवाल्यानें स्वतः आणि श्रीसासवडकरांनींसुद्धां वास घेतला, महाराज म्हणतात तेंच खरें अशी त्या दोघांची खात्री झाली. अत्तरवाला गडबडला. त्याला मोठी भीति वाटली. ह्या मळकट कोटाचा मनुष्य साधु असावा, अशी त्याची खात्री झाली. त्याचा उर्मटपणा व गर्व ताबडतोब विराम पावला. ताबडतोब त्यानें महाराजांच्या पायावर लोळण घेतली व क्षमा मागितली. श्री. सासवडकरांना हंसू आलें. महाराज अत्तरवाल्याला म्हणाले, 'मी ह्यांत कांहीं केलें नाहीं. सर्व अत्तरांना साधें तेल वापरतात. तुम्ही तरी तसें करीत असतां असें मी ऐकलें आहे. म्हणून हीं अत्तरें पूर्वीच्या साध्या तेलाप्रमाणें झालीं आहेत, मग त्यांत नवल काय?' तथापि महाराजांना त्याची दया आली, आणि सर्व अत्तरें पूर्वी जशीं सौगंधिक होतीं तशी त्यांनीं करून दिलीं. अत्तरवाला महाराजांची क्षमा मागून निघून गेला.

# ममतेचें मायावी स्वरूप

प्रत्येक मनुष्याला स्वास्थ्य मिळणें जरूर आहे. स्वास्थ्य म्हणजे स्वस्थपणा, शांतपणा; परंतु ही जरूरीची गोष्ट पुष्कळ लोकांच्या वांट्यास येत नाहीं. आणि धडपड करूनही; ती आयुष्याच्या अखेरीपर्यंत पुष्कळांच्या वांट्यास येत नाहीं. आणि ती कशी यावी ? आपले प्रयत्न भलत्या व विरुद्ध मार्गानें चाललेले असतात. स्वास्थ्य—ज्याची मती 'स्व'च्या ठायीं अधिष्ठित झाली, निज स्वरूपाची ज्याला ओळख पटली त्यालाच स्वस्थपणा मिळावयाचा. स्वास्थ्य मिळविण्याचें अमोघ साधन म्हणजे ईश्वरभक्ति.

### दुःखाचें कारण ममता

आपण बंधनांत केव्हां सांपडतों व स्वतंत्र केव्हां होऊं शकतों ? ममता केली म्हणजे बंधन मागें लागलें. मग ती ममता कोणत्याहि गोष्टीची किंवा प्राण्याची असो. आणि निर्ममत्व स्वीकारलें म्हणजे मनुष्य स्वतंत्र झाला. आसक्तिभाव आपणांस कोणत्या तरी गोष्टीशीं बांधून ठेवीत असतो. अनासक्ति निर्माण झाली म्हणजे मोक्षाचा, मुक्ततेचा मार्ग मोकळा होतो.

स्मृति सांगते—'**ममेति दुःखमूलं हि निर्ममेति च निर्वृतिः । शुकस्य विगमे दुःखं न दुःखं गृहमूषके ॥**'

ममता बाळगणें हेंच सर्व दुःखांचें मूळ आहे. कशाबद्दलहि ममत्व न बाळगणाऱ्यास मोक्षसुखाचा लाभ होत असतो. उदाहरणादाखल सांगितलें आहे कीं, आपण आपल्या घरांत पोपट पाळतों. उंदीर आपल्या घरांत स्वैर बावरत असतातच. पोपट कांहीं कारणामुळें कालवश झाला असतां आपणांस पराकाष्ठेचें दुःख होतें. कारण त्यावर आपली ममता जडलेली असते. घरांतील उंदीर मेला तर त्याचें आपण सुखदुःख मानीत नाहीं !

### बोरांतील कीड व्हावें लागलें

मनाचा स्वभाव मोठा विचित्र असतो. कधीं कधीं मन सर्वस्वाचा त्याग करतें आणि एखाद्या क्षुल्लक वस्तूवर तरी ममता कायम रहाते. ती आसक्तीच शेवटीं नडते. राजा भरताची हरिणावर फार आसक्ति होती आणि शेवटीं त्याला हरिणाच्या जन्मास यावें लागलें. असेंहि सांगतात कीं, एक मोठा साधु होता. त्याची यःकश्चित् बोरावर आसक्ति जडली होती. त्याला बोरांतील कीड होऊन जन्म घ्यावा लागला. अशा प्रकारचे अनेक दृष्टांत देतां येण्यासारखे आहेत. तात्पर्य एवढेंच कीं, आसक्ति, ममता ही शेवटीं नडते.

त्यासाठीं मनावर सक्त पहारा ठेविला पाहिजे. सर्वस्वाचा त्याग केला तरीहि शेवटीं कुठें ना कुठें ममत्व शिल्लक रहातच असतें.

## अष्टावक्रमुनींची गोष्ट

एकदां जनक राजानें अष्टावक्र मुनीस आपल्याजवळ मोठ्या समारोहानें व आदर-सत्कारपूर्वक ठेविलें. रोज सायंकाळीं त्यांचीं वेदान्तावर प्रवचनें होत असत. राजा जनकाच्या दरबारांत मोठमोठे व नामांकित संत, महात्मे व सन्यासी नित्यशः असत. प्रत्येकाच्या इच्छेप्रमाणें त्यांची रहाण्यासवरण्याची व खाण्यापिण्याची व्यवस्था ठेविली जात असे. ते सर्व लोक सायंकाळच्या प्रवचनासाठीं येत असत. राजा जनकही त्यावेळीं हजर रहात असे.

कधीं कधीं जनक राजाला प्रवचन स्थळीं यायला उशीर होत असे. त्यांचें आगमन झाल्याशिवाय प्रवचन सुरू होत नसे.

अशावेळीं श्रोत्यांतून आवाज येत असे कीं, "महाराज! वेळ बराच झाला; आतां सुरू करा ना प्रवचन!"

अष्टावक्र मुनी: येऊं द्या महाराजांना!

## अधिक महत्त्व कां देतां?

श्रोतृगण: अहो! त्यांची काय वाट पहायची? ते राजा आहेत. त्यांना राज्य चालवायचें असतें. त्यांना इकडे यायला वेळ मिळाला पाहिजे ना? वेळ मिळेल त्याप्रमाणें येणार! प्रवचनाचे अधिकारी आम्हीं आहोंत. राजेसाहेबांचें काय? तुमच्या आमच्या सन्ततेसाठीं ते येऊन बसतात! आम्हांला आत्मप्राप्ति करून घ्यायची आहे. त्यासाठीं सर्वस्वाचा त्याग करून आम्हीं येथें आलों आहोंत. राजा जनक मिथिला नगरीचे राजे आहेत. तेव्हां त्यांची वाट पहात न बसतां आपण प्रवचन सुरू करावें. त्यांना अधिक महत्त्व देण्यांत कोणता बरें फायदा?"

अष्टावक्र मुनींनीं यावर उत्तर कांहींच दिलें नाहीं व राजा येण्यापूर्वी प्रवचन केव्हांही सुरू केलें नाहीं!

असे प्रसंग २।४ वेळां आले व गेले. प्रत्येक वेळीं श्रोत्यांची तीच ती कुरकुर चाललेली असे. एके दिवशीं अष्टावक्र मुनींनी यावर उपाययोजना करण्याचें ठरविलें.

## अहो! आग लागली!

नेहमीप्रमाणें जनक राजाचें आगमन झाल्यानंतर प्रवचन सुरू झालें. थोडा वेळ गेल्यानंतर मध्येंच प्रवचन थांबवून अष्टावक्र मुनी मोठमोठ्यानें ओरडूं लागले कीं, 'अहो! पहातां काय? ती पहा चारी बाजूंस आग लागली आहे! या आगींत सर्व जळून भस्म होणार! केवढी ही आग! श्रोत्यांनीं मागें वळून पाहिलें तों काय? खरोखरच आगीच्या ज्वाळा भडकून चाललेल्या दिसूं लागल्या. हां हां म्हणतां ती अगदीं नजीक येऊन ठेपली. प्रत्येकाचा कांहीं ना कांहीं संसार होताच. तो संभाळण्यासाठीं प्रत्येकजण वाट मिळेल तेथून धांवत पळत सुटला! एकही श्रोता आसनावर शिल्लक राहिला नाहीं.

राजा जनक मात्र स्वस्थानीं निश्चिंतपणें बसलेला होता. त्याला त्या अवस्थेंत पाहून अष्टावक्र म्हणाले, ' राजा ! हें काय ? सर्वत्र आगीचा डोंब उसळलेला दिसत नाहीं का तुला ? आणि ह्या अग्निप्रलय पाहून तूं येथेंच बसलेला ! पहातोस काय ? ऊठ लौकर; नाहींतर तुझें सर्वस्व जळून खाक होईल ! सर्वस्वाचा त्याग करून येथें येऊन राहिलेले हे लोक सुद्धां आपापल्या वस्तूंचें रक्षण करण्यासाठीं कसे पहा धांवत पळत सुटले आहेत ! आणि तूं आपला इथेंच ! '

### जनक राजाचें उत्तर

यावर जनक राजा काय म्हणाला ? राजा म्हणाला, ' महाराज ! सारी मिथिला नगरी आगींत जळून भस्म झाली तरी त्यांत माझें कांहीं बिघडणार नाहीं ! माझें काय जळणार आहे ? मिथिला नगरीचें रक्षण करण्यासाठीं तुम्हीं मला येवून उठायला सांगत अहांत; परंतु ही नगरी ज्याची आहे, तो तिचें रक्षण करायला समर्थ आहे. तिची चिंता मी कां वहावी ? आपल्या कृपा प्रसादानें मी अनुभव घेऊन चुकलों आहे कीं, '**अकिंचन भवं स्वास्थ्य कौपिनत्वेऽपि दुर्लभम्**' महाराज ! या जगांत माझें असें कांहींएक नाहीं. जें कांहीं आहे तें सर्व भगवंताचें आहे. या तत्वाप्रत मी येऊन ठेपलों आहे. त्यामुळें कोणतीही गोष्ट, कोणतीही घडामोड माझें स्वास्थ्य हिरावून घेऊं शकत नाहीं. सर्वस्वाचा त्याग केला म्हणणाऱ्या लंगोटधारीनांही तें स्वास्थ्य मिळत नाहीं, हें आपण आत्तांच पाहिलें आहे."

अष्टावक्र म्हणाले, "अभयं प्राप्तोऽसि जनक !" "राजा ! धन्य आहेस तूं ! तूं खरोखर निर्भयपद प्राप्त करून घेतलें आहेस. खरें स्वास्थ्य, खरीखुरी विश्रांति तूंच संपादन केली आहेस ! "

### ह्या मायेचा पसारा

प्रिय वाचक ! ईश्वरी मायेचें स्वरूप कसें असतें तें येथें आपणास पहायला मिळत आहे. अनेक थोर माणसें, वाटल्यास महात्मे म्हणा, आपलें घरदार, मुलें माणसें सोडून व कौपिनधारी होऊन भटकत भटकत जनक राजाकडे आलीं. राजानें त्या सज्जनांस आश्रय दिला. त्यांना रहायला झोंपड्या दिल्या व त्यांना जरूर त्या वस्तुहि दिल्या. तशा स्थितींत ते लोक तेथें आनंदानें राहिले. त्यांच्याजवळ जें कांहीं आतां होतें तें सर्व राजानें जरूरीप्रमाणें दिलेलें. परंतु कोणाची कमंडलूवर, कोणाची पोथीवर, तर कोणाची पासोडी-वर माया ममता गुंतून राहिलेली. आग लागल्याचें समजतांच त्यांची माया ममता जागी झाली व आपआपल्या आवडीच्या व आवश्यक वस्तूंच्या बचावासाठीं ते लोक पळत सुटले !

आणि राजा जनकाकडे पहा ! साऱ्या मिथिलेचें राज्य व सारें वैभव त्याचें होतें. परंतु तें सर्व तो आपलें मानीत नव्हता. त्याला त्याचें ममत्व वाटत नव्हतें. मला काय करायचंय; ज्याचें असेल तो पाहून घेईल ! मी कशाला माझें स्वास्थ्य गमावून बसूं ? असा विचार करून राजा जागच्या जागीं स्वस्थ बसून राहिला.

# कांहीं हितकर व रुचकर

### जें घडें पृथ्वीच्या पाठीं—

कोणतीही परिस्थिति वाट्यास येवो, येईल त्या परिस्थितींत आनंदानें रहाण्याचा सराव करायला हवा. अमुक मिळावें तें मिळालें नाहीं, याबद्दल खेद मानूं नकोस. झाल्या गेल्याचें दुःख करीत व तें खिजवीत बसूं नकोस. जें होऊन गेलें त्याचें दुःख करीत बसण्यांत फायदा कोणता ? जें कांहीं चालू आहे त्यांत समाधान व संतोष मानून रहा. सर्व धर्मांचें, सर्व पुण्यकर्मांचें, जपाचें, तीर्थाटनाचें, परोपकाराचें किंवा दानधर्माचें फळ एकच .स्वतःच्या मनाचें समाधान, स्वतःचा आनंद. वाट्यास येईल त्या परिस्थितींत समाधान मानून रहाणें. सदासर्वकाळ आनंदांत रहाणें. ' जें घडे पृथ्वीच्या पाठीं । तें मनोरंजनासाठीं । केवळ ॥ या महामंत्राचा विसर केव्हांही पडूं देऊं नकोस !

× × ×

### स्वर्ग स्वतः मेल्याशिवाय दिसत नाहीं !

ईश्वर कसा आहे, त्याचें स्वरूप कसें आहे, तें जाणून घेण्याच्या खटाटोपांत तूं कशाला पडतोस ? नको ते खटाटोप ! आत्मा एक आहे कीं अनेक आहेत, या भानगडींत तूं पडूं नकोस. तुझ्या मनाला शांतता कशी लाभेल, तुझें मन निर्विकार कसें होईल, हें पहा. तो रस्ता शोधून काढ व त्याप्रमाणें आचरण कर. आशा, आकांक्षा व लाभाचा त्याग केल्याशिवाय, सत्य, सदाचार, संतोष, दयाभाव व प्रेम यांचें आचरण केल्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही उपायांनीं तुला संपूर्ण शांति मिळणार नाहीं. ज्यामुळें मन द्विधा होतें, पश्चात्ताप होतो, जें करण्यांत भीति आहे, जें केलें असतां दुःख, चिंता व भय वाटण्याचा संभव, जें केल्यानें सुखाची झोप येणार नाहीं, तें कधींही करूं नकोस. एवढें केलेंस म्हणजे तुला परमात्म्याची ओळख पटण्याचा मार्ग आपोआप खुला होईल. मग तुझें तुला आढळून येईल कीं सर्व प्राणीमात्रांत एकच एक परमात्मा व्यापून राहिला आहे. ' स्वतः मेल्याशिवाय स्वर्ग दृष्टीस पडत नाहीं. ' दुसऱ्यांनीं कितीही कंठशोष केला तरी त्याचा काय बरं उपयोग ?

× × ×

### देव भावाचा भुकेला

या जगांतील सुखसंपत्ति व इतर साधनें तुला पाहिजेत ? मग दीर्घोद्योग कर; ईश्वराची आठवण नेहमीं ठेव. जें करशील तें त्याला आठवून त्याच्यासाठीं म्हणून कर. गुणी हो. गुणी माणसाचा या जगांत सर्वत्र जय होत असतो. ' गुणाः पूजा स्थानं. ' गुणी माणूस सर्वांना आवडतो व पूजनीय ठरतो. गुणी माणूस जें काय हवें असेल तें मिळवूं शकतो. ईश्वराला गुणी माणूस भारी आवडतो. अवगुणी माणसाकडे तो ढुंकूनही पहात

श्री ज्ञानेश्वरी अनुवाद

# अमृत

लेखक : वि. पां. सातपुते, मुंबई

नमो ज्ञानेश्वरा निष्कलंका । जयाची गीतेची वाचितां टीका ।
ज्ञान होय लोकां । अतिभाविकां ग्रंथार्थीयां ॥ —श्री एकनाथमहाराज.

× × ×

विस्तरेणात्मनो योगं विभूतिं च जनार्दन ॥
भूयःकथय तृप्तिर्हि शृण्वतो नास्ति मेऽमृतम् ॥ —गी. १०–१८

आणि पुसिलिया जिया विभूती । त्याही बोलाविया भूतपती । एथ म्हणसी जरी पुढती काय सांगो ॥ तरी हा भाव मना । झणें जाय हो जनार्दना । पैं प्राकृताही अमृतपाना । ना न म्हणवे जेवीं ॥ जें काळकूटाचें सहोदर । जें मृत्यूभेणें प्याले अमर । तरी दिहाचे पुरंदर । चौदा जाती । ऐसा कवण एक क्षीराब्धीचा रसु । जया वायांचि अमृतपणाचा आभासु । तयाचाही मीठांशु । जैं पुरे म्हणों नेदी । तया पाबळयाही येतुलेवरी । गोडियेची आथी थोरी । मग हें तंव अवधारीं । परमामृत साचें ॥ जें मंदराचलु न ढाळितां । क्षीरसागरु न डहुळितां । अनादि स्वभावतां । आइतें आहे ॥ जें स्तवे ना द्रवे नव्हे, बद्ध । जेथ नेणिजती रस गंध । जें भलतयाही सिद्ध । आठवलेंचि फावे ॥ जयाची गोठीचि ऐकत खेवों । आघवा संसारु होय वावो । बळिया नित्यता लागे येवों । आपण पांचि ॥ जन्ममृत्यूची भाख । हारपोनि जाय निःशेख । आंत बाहेरी महासुख । वाढोंचि लागे ॥ मग दैवगत्या जरी सेविजे । तरी तें आपणचि होऊन ठाकिजे । तें तुज देतां चित्त माझें । पुरे म्हणों न शके ॥ तंव तुझें नामाचि आम्हां आवडे । वरी भेटी होय आणि जवळीक जोडे । पाठीं गोठी सांगसी सुखाडें । आनंदाचे नि ॥ आतां हें सुख कायिसया सारिखें । कांहीं निर्वचेना मज परितोखें । परि येतुलें जाणें जे येणें मुखें । पुनरुक्तही हो ॥ हां गा सूर्य काय शिळा । अग्नि म्हणों येत आहे वोंविळा ॥ कां नित्य वाहतया गंगाजळा । पारसेपण असे ॥ तुवां स्वमुखें जें बोलिलें । हें आम्हीं नादासि रूप देखिलें । आजि चंदनतरूचीं फुलें । तुरंबीत आहों मा ॥ ( ज्ञा. १९०–२०३ )

वरील श्लोक व तद्विषयक टीका ओंव्या गीता–ज्ञानेश्वरींतील विभूति योगनामक दहाव्या अध्यायांतील आहेत. यांतील " भूयः कथय " व " अमृतम् " या दोन पदांवर ज्ञानेश्वर महाराजांनीं जें प्रासादिक व्याख्यान केलें आहे, त्याचा थोडक्यांत अनुवाद करीत आहे.

" अमृतम् " या पदावर शांकरभाष्यांत जवळ जवळ मुळींच विस्तार नाहीं. अर्जुनाच्या तोंडीं " त्वन्मुख निसृत वाक्यामृतम् " असे स्पष्टीकरणात्मक दोन शब्द योजिले

आहेत. ज्ञानेश्वरमहाराजांच्या प्रतिभेस मात्र याच पदांत काव्याविष्कारास स्थान दिसून येऊन, त्यांनीं क्षीरसागर मंथननिर्मित "प्राकृत" व "पावळें" अमृत व अर्जुनास प्रत्यक्षतः प्राप्त होत असलेलें भगवन्वचनामृत यांची अलंकारिक तुलना करून "वचनामृतच" कां व कसें श्रेष्ठ आहे हें अर्जुनाच्या तोंडून वदविलें आहे.

ज्ञानेश्वरी म्हणजे गीतेची निःपक्षपाती टीका आहे हें जरी खरें असलें, तरी व्याख्यान करतांना श्लोकांतील पदांचा अनुक्रम बदलला असल्याचें ज्ञानेश्वरींत अनेक ठिकाणीं दिसून येतें. या श्लोकाच्या व्याख्यानांतही, श्लोकांत "भूयः कथय व "अमृतम्" असा पदांचा क्रम असला तरी "अमृतम्" चें व्याख्यान प्रथम व "भूयः कथय" चें व्याख्यान नंतर, असें केलें आहे. आतां ओव्यांचा थोडक्यांत अनुवाद असा :

अर्जुन म्हणत आहे—भगवंता, आपण आतांच व मागेंही ( रसोऽहमप्सु० अ. ७-८ ) विभूति सांगितल्या, आतां पुन्हा काय विचारतोस असें म्हणाल ( १९० ) तर, आपणास असें वाटण्याचें कारण नाहीं. ( येथपर्यंत 'अमृतम्' या पदाच्या व्याख्यानाचा उपक्रम झाला ) कारण, 'प्राकृत' अमृतपानासही, कितीही प्राप्त झालें तरी पुरें म्हणवत नाहीं ( १९१ ). ( आतां हें पुराणांतरीचें अमृत 'प्राकृत' कसें ? ). ज्याचा जन्म कालकूट विषाबरोबर झालेला आहे. ( क्षीरसमुद्रमंथनांतून निघालेल्या १४ रत्नांपैकीं अमृत व विष हीं दोन आहेत हें सर्व प्रसिद्ध आहे ), म्हणावयास अमृत, परंतु मृत्यूच्या भीतीनें ज्याचें देवांनीं प्राशन केलें, तरीही देव अमर नाहींत. आम्हां मानवांच्या तुलनेनें देव जरी अमर असले तरी ब्रह्मदेवाच्या एका दिवसांत देवांचा राजा इंद्र असे चौदा इंद्र होतात व जातात ( १९२ ) एवं गुणविशिष्ट, फक्त ऐकीव माहितीचा, जो कधीं कोणासही पाहाण्यास मिळाला नाहीं असा, कोठेंतरी आस्तित्वांत असलेल्या क्षीरसमुद्रापासून उत्पन्न झालेला रस, ज्याला उगीचच अमृत्त्वाचा अभास आहे, ( असे नसतें तर अमृत-वाटणीच्याच वेळीं राहूचा मृत्यु होता ना ), त्याचा सुद्धां गोडीचा एक अल्पस्वल्प अंश मिळाला तरी पुरें म्हणवत नाहीं, तृप्ति होत नाहीं ( १९३ ) त्या 'पावळ्या' 'फिक्या' अमृताच्या गोडीवर सुद्धां मानवांच्या उड्या पडतात, असें आहे, तर, आपण सध्यां जो मला उपदेश करीत आहां तो गीताशास्त्र व्याख्यान प्रवाह तर प्रत्यक्ष 'परमामृत' आहे ( १९४ ) हें परमामृत कसें ? तर याच्या वाक्यामृताच्या ) प्राप्तिसाठीं क्षीरसमुद्राचें मंथन करावें लागत नाहीं, मंदराचलाला हालवावें लागत नाहीं, जें सनातन भगवत्स्वरूपाप्रमाणेंच अनादि व आयतें ( सिद्ध ) आहे, ज्याच्या सिद्धीसाठीं कांहीं आयास करावे लागत नाहींत. ( १९५ ) जें दृश्य नाहीं म्हणून, घट्ट, पातळ, कठीण वगैरेंनीं वर्णन करतां येत नाहीं, ज्याच्या ठिकाणीं चव किंवा वास संभवत नाहीं ( चव व वास हे इंद्रियांचे धर्म आहेत व हें परमामृत इंद्रियातीत आहे ), जें वाटेल त्याला उपलब्ध आहे. ( प्राकृत अमृताचा लाभ फक्त देवांनाच आहे ), व ज्याचें स्मरण केल्याबरोबर प्राप्ती होते. ( गीता—ज्ञानेश्वरीच्या स्मरणानें अमृत प्राप्तीतुल्य आनंद होतो हें अनुभवसिद्ध आहे ) ज्याच्या श्रवणाबरोबर जन्ममरणरूप संसार मिथ्या होतो. ( वाक्य हा

# बाबांची दिव्य वाणी

लेखक : आप्पाराव

ईश्वराचें सामर्थ्य व त्याची लीला अगाध आहे. आम्हीं हें जाणतों व त्याची भक्ति करतों; परंतु ती भक्ति केवळ दिखाऊ असते. तो भक्तीचा बाजार असतो. लोकांच्या डोळ्यांत त्यामुळें आम्हीं धूळ फेकूं शकतो, परंतु देवाची त्यामुळें फसवणूक करतां येणार नाहीं. निष्ठेशिवाय, श्रद्धेशिवाय सर्व व्यर्थ आहे. 'जो भजलागी अनन्य शरण ! **विश्वासयुक्त** करी मद्भजन । माझें चिंतन माझें स्मरण । तयाचें उद्धरण ब्रीद माझें ॥

## स्वतःस विचारून पहावें

श्रीसाई बाबानीं हें निर्धारपूर्वक सांगितलें आहे; परंतु अनन्य शरणागति आमच्याकडून घडत असते काय ? आम्हीं जी पूजा अर्चा करतों, भक्ति करतों, ती विश्वासपूर्वक श्रद्धायुक्त अंतःकरणानें करतों काय ? प्रत्येकानें हा प्रश्न स्वतःस विचारून त्यांचें काय उत्तर मिळतें तें पहावें.

आमचें सर्व कांहीं शब्दपांडित्य असतें. अंतःकरणापासून कांहीं नसतें. आणि जर तसें असतें तर आपल्या घरींदारीं व सभोंवार जें दुःख दैन्य दिसतें तें आढळून आलें नसतें.

' लक्ष लावी जो मजकडे ! नाहीं तयासी कैचेंही सांकडें ! तोच जैं विसर पडे ! माया कोरडे उडवी तैं ॥ '

## सारा दिखाऊपणाचा कारभार

आमच्यावर संकटें कोसळतात, दुःखताप सहन करावा लागतो, कारण आमचें अंतःकरणापासून कांहींच नसतें. सारा वरवरचा, दिखाऊपणाचा कारभार !

आम्हीं स्वतःला आस्तिक व श्रद्धाळू समजतों. कसले समजतों ? त्यांत दांभिकपणाचाच भाग जास्त असतो ! असल्या दांभिकपणापेक्षां धडधडीत नास्तिकपणा बरा !

भगवंताच्या कृपेवर, त्याच्या अतर्क्य सामर्थ्यावर आमची दृढ श्रद्धा असली पाहिजे. त्याची नजर चोहींकडे असते. त्याला कोनाकोपऱ्यांत जगाच्या कुठल्याही भागांत काय चाललें आहे हें दिसतें. तो सर्वसाक्षी, सर्वत्र व सर्वव्यापी आहे.

' कुठेंही असा कांहींहीं करा । एवढें पूर्ण सदैव स्मरा । कीं तुमच्या कृतीच्या इत्थंभूत खबरा । मज निरंतर लागती ॥ '

## ती वाणी अंतःकरणाची पकड घेते का ?

बाबांची ही दिव्यवाणी आम्हीं वाचतों व घोकतों; परंतु तिनें अंतःकरणाचा ठाव घेतला आहे काय ? ती वाणी अंतःकरणांत रुजली आहे काय ? तिनें मूळ धरलें आहे

काय ! आणि मग तुमच्याकडून पापकर्म केव्हांही घडणार नाहीं. सत्यानें, धर्मानें व न्यायनीतीनें वागावें असेंच तुम्हांला वाटेल. मग तुम्हीं सर्वांशीं प्रेमानें व बंधुभावानें वागू लागाल. असत्याचरण चुकूनही करणार नाहीं. कोणाला तोडणार नाहीं, अपशब्द बोलणार नाहीं, मग तुम्हीं केवळ स्वार्थावर नजर ठेऊन रहाणार नाहीं, तर दुसऱ्यांचाही स्वार्थ साधला पाहिजे असें वाटेल. जोंपर्यंत तुमच्या वागणुकींत अशा प्रकारचा थारेपालट घडून आला नाहीं, तोंपर्यंत खऱ्या देवभक्तीच्या ओलाव्याचा तुम्हांला स्पर्शही झालेला नाहीं, असेंच समजलें पाहिजे.

**काय ही दुर्घटना**

आकाशांत काळे ढग जमा झाले, जिकडेतिकडे काळोख दिसूं लागला म्हणजे काय ही दुर्घटना, किती दुःखदायक गोष्ट आहे ही, असें आपण म्हणतों. परंतु खरी दुर्घटना ती, खरा दुर्दैवी दिवस तोच कीं, ज्या दिवशीं रामनामाची आपणांस आठवण होणार नाहीं व रामनाम कानांत पडून ते पुण्यपावन होणार नाहींत.

तद्दिनं दुर्दिनं मन्ये मेघाच्छन्ने न दुर्दिनम् ।
यद् दिनं कर्णपीयूष—कथा श्रवण वर्जितम् ॥

आजकाल श्रद्धाभाव, देवधर्मासंबंधीं निष्ठा दुर्मिळ झाली आहे आणि त्यामुळें बहुजन समाज दुःखतापांत होरपळत आहे. वरवर देवाचें नांव घेतल्यानें व देखाव्यासाठीं देवपूजेचें अवडंबर माजविल्यानें का देव पावणार आहे ? व तुमच्या मनाला शाश्वत शांति मिळणार आहे ?

**निष्ठेशिवाय सारें व्यर्थ**

जें जें कांहीं कराल, मग ती पूजाअर्चा असो, तुमचा रोजचा रोजगार धंदा असो, कांहीही असो, तें निष्ठापूर्वक घडलें पाहिजे, तरच त्यांत यश मिळेल, नाहींतर काय ? सारा पोकळ कारभार !

नारायणाचें नांव निष्ठापूर्वक घेणें हीच खरी संपत्ति व त्यांत सारें वैभव आहे. आणि खरी आपत्ति जर कोणती असेल तर ती म्हणजे नारायणाचें—विष्णूचें विस्मरण हीच होय. यासाठीं खरी संपत्ति संपादन करण्याच्या मागें आपण लागलें पाहिजे.

विपदो नैव विपदः सम्पदो नैव सम्पदः
विपद् विस्मरणं विष्णोः सम्पन् नारायण स्मृतिः

आपलें जीवन प्रकाशमान, तेजस्वी व वैभवशाली करण्याचें साधन म्हणजे देवावरील असीम श्रद्धा हेंच होय. आमच्या हातीं काय आहे ! कर्ता करविता, देता देवविता तो भगवन्त आहे; तो तारणारा व तोच मारणारा.

यासाठींच बाबांनीं सांगितलें आहे कीं,

मात्र माझें करा स्मरण । विश्वासयुक्त अंतःकरण ।
टेवा करा निष्काम भजन । कृत कल्याण पावाल ॥

# संत नामदेवांची अमृतवाणी

संग्राहक : ग. वि. काविटकर एम. ए.

शूरवीर शीख समाजाचा आदिग्रंथ 'श्रीगुरु ग्रंथ साहेब' यामध्ये संत नामदेवांच्या ६१ पदांचा अंतर्भाव झाला असून त्यांचा इंग्रजी अनुवाद श्री. एम्. ए. मेकॉलिफ यांनी व मराठी अनुवाद श्री. जी. व्ही. काविटकर एम्. ए. यानीं केलेला, आमच्या वाचकांसाठीं श्री साईलीलेंत मधून मधून देण्याचा विचार आहे.

—संपादक

राग : प्रभाती

अकुल पुरुख इकु चलितु उपाइआ ॥
घटिघटि अंतरि ब्रह्मु लुकाइआ ॥
जीअकी जोति न जाने कोई ॥
तै मैं किआ सु मालूमु होई ॥
जिऊ प्रगासिआ माटी कुंभऊ ॥
आपही करता बीठलु देऊ ॥
जीअका बंधनु करम बिआपै ॥
जो किछु किआ सो आपै आपै ॥
प्रणवति नामदेऊ इहु जीऊ चितवै सुलहै ॥
अमरु होई सद आकुल रहै ॥

The Inscrutable Being invented a play
God is concealed in every heart,
No one knoweth the nature of the Soul's light;
What we ourselves have done, Thou knowest.
As an earthen vessel is produced from clay,
So Vithal created the world.
The Soul's entanglements depend on its acts.
It is itself responsible for what it hath done.
Namdev representeth, the soul obtaineth the result of its thoughts;
The soul which always remaineth fixed on
The Inscrutable one becometh immortal.

अकाल पुरुषानें मांडिलेला हा एक खेळ आहे. प्रत्येक घटाच्या (शरीराच्या) अंतर्यामीं ब्रह्म प्रकाशत आहे. अंतःकरणांतील आत्मज्योति कोणी जाणून घेत नाहीं. त्याकरितां आम्ही काय काय केलें तें तुम्ही जाणत आहां. मातीचे घट व्हावेत, त्याप्रमाणें विठ्ठलदेवानें आपणच हें विश्व निर्माण केलें. जीवाचें बंधन आपल्याच कर्माचा व्याप किंवा फल होय. आपण जें कांहीं करतों त्याप्रमाणें फलप्राप्ति होते. नामदेव म्हणतात, या ठिकाणीं ज्याप्रमाणें चिंतन करावें, त्याप्रमाणें लाभ होतो. ब्रह्माचें चिंतन नित्य कराल तर अमरत्व प्राप्त करून घ्याल.

---



## वर्गणीदार होऊं इच्छिणाऱ्यांस विनंती

श्रीसांईलीलेचें नवीन वर्ष एप्रिलपासून सुरू होतें. वर्षारंभापासून वर्गणीदार होणें हें केव्हांहि चांगलेंच; परंतु ज्यांना वर्षारंभ चुकेल त्यांना वर्षांतील कोणत्याहि महिन्यापासून श्रीसांईलीलेचें वर्गणीदार होतां येतें.

गेल्या अंकीं आम्हीं केलेल्या विनंतीस मान देऊन अनेकांनीं वर्गणीदार या नात्यानें आपापली पांच रु. वार्षिक वर्गणी पाठवून वर्गणीदारांच्या यादींत आपली नांवे समाविष्ट केलीं, याबद्दल आम्हीं त्या सर्वांचे आभारी आहोंत.

यापुढेंहि वर्गणीदारांची संख्या उत्तरोत्तर झपाट्यानें वाढत जाऊन श्रीसांईबाबांचा प्रेरक व जीवन सुफलदायी करणारा संदेश महाराष्ट्रांतील घरोघरीं जाईल, व या कार्यांत आमचे साईभक्त वाचक शक्य तेवढें जास्तींत जास्त सहकार्य करण्यासाठीं पुढें येतील, अशी आम्हांला बळकट आशा वाटत आहे.

श्री साई लीलेची वार्षिक वर्गणी अवघी ५ रु. असून त्याच वर्गणींत पुण्यतिथि व श्रीरामनवमी निमित्त निघणारे दोन विशेषांकही मिळतात. श्रीसाईलीला व्ही. पी. नें पाठविली जात नाहीं. तरी वर्गणीदार होऊं इच्छिणाऱ्यांनीं रु. ५ ( ट. ख. सह ) खालील पत्त्यावर मनि ऑर्डरीनें पाठवावे, अशी विनंती आहे.

संपादकः—**श्रीसाईलीला**
ईस्ट अँड वेस्ट इ. कं. बिल्डींग ४१।५५
अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई नं. १

.........

# नीलवर्ण घनःश्याम

लेखक : केशवराव कृ. प्रधान B. A. L. L. B.

पृथ्वी, आप, तेज, वायु—आणि आकाश. पंचमहाभूतांतील अगदीं शेवटचें तत्व—नीलवर्ण आकाश

आकाशाचा निळा वर्ण सर्व बाजूनीं ज्यानें अगदीं लपेटून घेतला आहे, तो श्यामसुन्दर नीलवर्ण घनःश्याम म्हणजेच श्रीकृष्ण. योगसमाधि स्थितींत सहस्रदला पलीकडे, ब्रह्मरन्ध्र भेदून जेव्हां योगी नील आकाशाशीं एकरूप होतो, तेव्हांच त्याला ह्या श्यामसुंदराचें चिदाकाशांत दर्शन होतें. जीव जेव्हां सर्व इंद्रियें डावलून शिवाशीं संलग्न होतो तेव्हांच, नीलवर्ण घनःश्याम, योग्याच्या हृदयकमलांतील नील बिसतन्तुतून बाहेर डोकावून मृदुमृदुल हास्य करूं लागतो.

आकाराच्या 'म्' म्हणजे लय स्थितींत ह्या परब्रह्म परमात्म्याचें—भगवान् श्रीकृष्णाचें, माहेर आहे. विश्वनिर्मितींत म्हणजे—'अ' मध्यें ह्यांच्या सर्वशक्तिमान् अजानुबाहुत्वाचा प्रभाव आहे. विश्वधारणेंत म्हणजे 'उ' मध्यें यांच्या दिव्य श्वासनिरोधनाची कृति आहे व विश्वविनाशांत म्हणजे 'म्' मध्ये याची अणुरेणूला मोहून टाकणारी—गोपगोपींच्या बरोबर केलेली वृन्दावनांतील रासक्रीडा आहे.

याच्या मधूर बांसरी निनादांत या वरील तिन्हीं कृति 'अउम्' स्वरांत नांदतात. त्यांच्या मुरलींतून 'अ' स्वर निघतांच कुंडलीनी—प्राणिमात्रांतील चेतनाशक्ति त्वरेनें नाभिकमलांतून जागृत होऊन उठून उभी रहाते. 'उ' स्वराबरोबर सर्व अवयव झाडून—ब्रह्मरंध्रापर्यंत मान उंचावते. 'म' स्वराबरोबर ब्रह्मरन्ध्र भेदून सृष्टींत, आकाशछत्राखालीं, वर दशदिशांना व्यापून उरलेल्या नीलवर्णांत घुसून घनश्यामाच्या पद्कमलांना स्पर्श करून—त्या घननीलाशीं एकरूप होऊन जाते.

नादब्रह्माचा उगमच 'म्' आहे. 'ॐ' शब्द पृथ्वीवरून 'अउम' असा दिसला, तरी उगमापासून 'मउअ' असा आहे. सर्व शब्दसृष्टीचा—नादसृष्टीचा परम आत्मा श्रीकृष्ण—तो घननीळ घनःश्याम श्रीकृष्ण, तो नन्दलाल श्रीकृष्ण—तो 'म्' मध्यें डोकावतो—व 'म्'च्याहि पलीकडे रहातो. त्याचें गोकुल 'अउम'च्या पलीकडे आहे. तरीही तो 'अ' स्वरूपानें मथुरेंत कंसवध करतो. 'उ' स्वरूपानें वृन्दावनांत गोपगोपीबरोबर क्रीडा करतो. 'म' स्वरूपानें प्राणिमात्रांच्या हृदयांत विराजमान होतो; व अउमच्याहि पलीकडे स्वतःच्या निराकार, निर्गुण निरंजन घननील स्वरूपांत, कालदेश नामरूप अतीत् अशा आपल्या स्वनिर्मित गोकुळांत रहातो.

मानवी मनाचे सर्व खेळ याच गोकुळाभोंवती चालतात. त्यांचे सर्व विचार कल्पना व सर्वभाव याच गोकुळाभोंवती सतत पिंगा घालीत असतात. मानवातील प्रकर्ष

बुद्धी आपली सर्व शक्ति एकवटून याच गोकुळाचा रस्ता शोधीत असते. त्या विचारांच्या, कल्पनेच्या, बुद्धीच्या, धडपडीमागें उभा राहून श्यामसुन्दर श्रीकृष्ण गालांतल्या गालांत खोडकरपणें हंसत सतत उभा असतो. एखाद्या चुकार विचारांतून, चुकार कल्पना समूहांतून क्वचित्काळीं बुद्धीच्या अति उच्च अशा तंद्रींतून—चटकन् गडद अंधकारांतून वीज चमकून जावी, तसा तो पुटकन् प्रगट होऊन पुन्हां लपून बसतो. त्याच्या क्षणैक दर्शनानें विश्व मोहून वेडें होतें. परंतु हा पुन्हां खोडकरपणानें लपून रहातो; व विश्वाला मोहक वाकुल्या घालीत बसतो.

दिवसामागें रात्र, ऋतूमागून ऋतु, प्रकाशामागून छाया असा हा पाठशिवणीचा खेळ हा प्यारा प्यारा गोकुळीचा श्रीकृष्ण जगाच्या आदीपासून अंतापर्यंत खेळत रहातो. गरीब बिचारा मानव ह्याला पकडण्यासाठीं अहोरात्र ह्याच्यामागें पळत सुटतो. तो थकतो. हा थकत नाहीं. तो दमून खालीं बसतो, निजतो, मूर्च्छित होतो. हा खुशाल कदंब वृक्षाखालीं यमुना डोहावर मुरली वाजवीत आणि मधून मधून हंसत शांत उभा असतो. तो प्रियदर्शन श्रीकृष्ण, तो जगाचा आत्मा—परम् आत्मा—ते विश्वाचें दुर्लभ पद—जे ऋषींचें गोजिरे सोजिरे गुपित—तो प्यारा प्यारा श्रीकृष्ण, ते योग्यांचें अतीव विश्रांती स्थान.

विश्वामध्यें निरनिराळया ऋतूंतून वाहणाऱ्या वाऱ्याच्या मागें, कधीं कधीं त्याच्या बरोबर—मलय पर्वतावरून येणाऱ्या दिव्य सुगंधासारखा—तो प्यारा गोकुळकृष्ण आपल्याला कधीं कधीं मिठी मारतो. अंग थरथरून येतें. वृत्ति उगीचच बहरतात. अष्ट सात्विक भाव पालवतात; व एक महान् मंगलमय घटीका आपल्या आयुष्यांत पदार्पण करिते.

भगवान श्रीकृष्ण अतीव प्रेमानें आपल्या गळ्याला मिठी मारून आपल्याला लाडीक साद घालतो. पण आपण ‘ ओ ’ देत नाहीं. हा मधुर मंगलमय क्षण चटकन् नाहींसा होतो. आपण मात्र पृथ्वीवरल्या दगडाधोंड्याशींच खेळत रहातों व जीवन निर्जिव, निरस आहे असें म्हणतों.

मानवी अन्तकरणांतील सर्व नवरसांत यथेच्छ डुंबावें—त्यांचा परिपोष करून त्यांतून मुरलीध्वनी निर्माण करून विश्वाला मोहिनी घालावी, याच एका हेतूनें. आपल्या हृदयांत क्षणैक प्रवेश करून हा श्रीकृष्ण तेथें नन्दनवनातील एक एक कोमल वेल लावून पालवीत असतो. आपल्याला तें कळत मात्र नाहीं. तेथें वृन्दावन निर्माण व्हावें, तेथें वृत्ति वृत्तीच्या गोपगोपांचा फेर धरून विश्वाच्या ह्या केन्द्र माधवाला रासक्रीडा करतां यावी—यासाठींच हें मानवी—जीवन तो निर्माण करतो. परंतु आपल्याला हें कळत नाहीं. आपण मात्र बदसूर जीवन व्यतीत करीत असतों.

नील मण्यासारख्या ज्यांच्या छाया आकाशांतून दूरदूर जात असतात, अशा ‘ ढगांचिया सावलीच्याच मागें, ते धावती हास्यरस प्रसंगे ’ असे ज्यांचें वर्णन केलेलें आहे ते गोपालकृष्णाचे सवंगडी—मानवी जीवनांतील भीषण छायांना, कल्पनेनें तयार

फळ! मी तर जन्मापासूनच खळ आहें. साई स्वतः दीनवत्सल आहेत. ही खरोखरच त्यांची कृपा आहे.

सिद्धकोटींत त्यांचा जन्म झाला असून त्यांचें वर्तन साधकाला शोभेल असें असलें तरी ते वृत्तीनें अती लीन व निरभिमानी आहेत आणि ते सर्वांचीं मनें सांभाळीत असतात. एकनाथांनीं ज्याप्रमाणें पैठण आणि आळंदीचे महत्व वाढविलें त्याचप्रमाणें श्रीसाईंनीं शिरडी महिमासंपन्न केली आहे. धन्य! धन्य! ते शिरडीचे पाषाण. धन्य! धन्य! तेथें उगवणारें गवत, कीं, दररोज अनायासे त्यांना बाबांच्या चरणांचें चुंबन घ्यावयास मिळत असून त्यांच्या चरणांची धूळ मस्तकीं धारण करावयास मिळते. शिरडी म्हणजे आम्हांला पंढरपूर, जगन्नाथपुरी, द्वारका, गया, काशी विश्वेश्वर, रामेश्वर बद्रिकेदार, नाशिक, त्र्यंबकेश्वर, उज्जयिनि, महाबळेश्वर, गोकर्ण वगैरे सिद्धतिर्थें व क्षेत्रें म्हणजेच आम्हाला शिरडी होय. शिरडींत आम्हांला साईबाबांचा समागम मिळतो तोच आम्हाला आगम निगम होय. तोच आमचीं संसारदुःखें नाहींशीं करणारा असून आमचा परमार्थाचा मार्ग सुगम करणारा आहे. श्रीसाईबाबांचें दर्शन हेंच आमचें योगसाधन असून त्यांच्यांशीं संभाषण केल्यानें आमच्या पापांचें क्षालन होत असतें. त्यांचें पादसंवाहन करणें हेंच आमचें त्रिवेणीस्नान असून त्यांच्या चरणतीर्थ प्राशनानें आमच्या वासनांचें निर्मूलन होतें. त्यांची आज्ञा आम्हाला वेदवचनासारखी असून त्यांच्या उदी प्रसाद सेवनानें आम्हां सर्वांना पुण्य प्राप्ती होते. श्रीसाई म्हणजेच आमचें परब्रह्म, आमचा परमार्थ, आमचे श्रीकृष्ण, श्रीराम आणि निजाराम आहेत. बाबा स्वतः द्वंद्वातीत असुन कधींही उल्हसित वा उद्विग्न होत नाहींत. ते सदोदित निज-स्वरूपीं दंग असताल. शिरडी हें मुख्य केंद्र असून बाबांचें क्षेत्र पंजाब, कलकत्ता, उत्तर हिंदुस्थान, गुजराथ, महाराष्ट्र आणि—कानडी प्रांतांपर्यंत विस्तारलेलें आहे. शिरडीची श्रीसाईंची समाधी म्हणजे संतांचा मेळावा असून तेथील मार्ग आक्रमितां प्रत्येक पावलाबरोबर जीवांच्या ग्रंथी सुटत असतात. समाधी दर्शन होणें म्हणजे जन्माचें सार्थक आहे. तर ज्यांना प्रत्यक्ष दर्शनसुखाचा लाभ होऊन ज्यांच्या आयुष्याचा कांहीं भाग बाबांच्या सेवेंत वेंचला गेला त्यांच्या भाग्याचें किती वर्णन करावें! मशीद आणि वाड्यावर लावलेलीं निशाणें आकाशांत फडकत असून जणूं काय बाबाच भक्तांना आपल्याकडे बोलावित आहेत. बाबा महंत म्हणून प्रसिद्ध झाले. गांवोगांवीं त्यांची कीर्ति पसरली. कोणी त्यांना खऱ्या श्रद्धेनें नवस करूं लागले तर कोणाला त्यांच्या दर्शनानें शांतता लाभली. कोणाचे कांहींही मनोगत असोत. बुद्धि कुत्सित किंवा शुद्ध असो, बाबांच्या दर्शनानें त्यांच्या चित्ताला शांति मिळूं लागली. सर्व लोक विस्मयचकित झाले! पंढरपूरच्या विठ्ठल—रखुमाईच्या दर्शनाची जी नवलाई तेंच विठ्ठल दर्शन बाबा शिरडींत देऊं लागले.

येथपर्यंत कोणाला ही अतिशयोक्ति वाटत असल्यास विठ्ठलभक्त गवळीबुवांची गोष्ट ऐका, म्हणजे तुमचें संशय निरसन होईल. गवळीबुवा पंढरीचे वारकरी होते. दरवर्षी

पंढरीची ते वारी करीत तशीच त्यांची शिरडीला फेरी होत असे. त्यांचें बाबांवर फार प्रेम होतें. बरोबर एक गाढव, एक शिष्य साथीदार हा त्यांचा परिवार आणि मुखानें सारखा 'रामकृष्णहरि' नामाचा गजर ते करीत. त्यांच्या वयाला पंचाण्णव वर्षें झालीं होतीं. चातुर्मासांत गंगेच्या तटावर राहवयाचें, आठ महिने पंढरपुरांत काढावयाचे आणि वर्षांतून एकदा बाबांची भेट घ्यावयाची, हा त्यांचा नेम असे त्यांनीं यावें, बाबांच्याकडे पाहून त्यांनीं नम्रपणानें म्हणावें, 'हाच माझा मूर्तिमंत पंढरीनाथ दयाळू अनाथनाथ आहे.' रेशमीकांठीं धोतरें नेसून कोणी संत होतील काय? स्वकष्टानें रक्ताचें पाणी करून हाडाचे मणी केले पाहिजेत. फुकटचा देव होतो का? हाच तो प्रत्यक्ष पंढरीराव आहे. अरेरे! वेडेरे! वेडे हें जग! दृढ भाव ठेवून येथेंच देव पाहा.' पांडुरंग भक्ताची ही उक्ति तेथें माझ्यासारख्या पामराचा अनुभव किती पुरा पडणार. श्रोत्यांनींच ही प्रतिति पाहावी. नामस्मरणावर बाबांचें मोठें प्रेम, स्वतः अखंड 'अल्ला मालीक' म्हणत असतात. स्वतःच्या नजरेखालीं रात्रंदिवस नामसप्ताह करून घेत असत.

एकदां बाबांनी दासगणूंना नामसप्ताह करण्याची आज्ञा केली. दासगणू कसे म्हणतात, 'बाबा, विठ्ठलमूर्ति प्रगट झाली पाहिजे.' बाबा छातीला हात लावून निक्षून सांगतात, 'होहो! का नाहीं प्रगटणार विठ्ठल. भक्त भावार्थी पाहिजे. डाकूरनाथाची डाकूरपूरी, पांडुरंगाची पंढरी आणि कृष्णाची द्वारका हीं सर्व येथेंच आहेत. दूर जावयास नको विठ्ठल काय एकांतांतून दुसरीकडून कुठून उठून येणार आहे. उत्कट भक्तिप्रेमानें तो तेथेंच प्रगटेल पुंडलीकाच्या मातापित्यांच्या सेवेला भुलून त्याच्या भक्तिभावासाठीं देवानें विटेवर विसावा घेतला आहे.' असो. सप्ताहाची समाप्ति होतांच दासगणूंना शिरडींतच विठ्ठल दर्शन प्राप्ति झाली. ही ह्या बाबांची प्रतिति.

एकदां काकासाहेब दिक्षितांनीं प्रातःस्नान उरकलें व नेहमींप्रमाणें ध्यानस्थ बसले असतांना त्यांना श्रीविठ्ठलाचें दर्शन झालें. पुढें बाबांचे दर्शनास जातांच बाबा त्यांना कौतुकानें विचारतात. 'काय विठ्ठल पाटील आला होता ना? मोठा पळपुट्या बरें कां तो! मेख मारून त्याला चित्तांत अढळ करून ठेवा. जरा दुर्लक्ष झालें तर दृष्टी चुकवून तो पळ काढील बरें.' हा झाला सकाळचा प्रकार! दुपारीं आणखी विठ्ठलदर्शनाचें कसें प्रत्यंतर मिळालें तें पाहा. कोणीं एक परगांवचा माणूस पंढरपूरच्या विठोबाची पांच पंचवीस छायाचित्रें घेऊन विकण्यासाठीं शिरडीस आला. सकाळीं ध्यानांत जी मूर्ती दिसली तसेंच रूप दिक्षितानीं फोटोंत पाहून त्यांना फारच विस्मय वाटला व त्यांना बाबांच्या बोलण्याची आठवण झाली. काकांनीं प्रेमानें एक छायाचित्र विकत घेतलें व मोठ्या भक्तिभावानें तें पूजेस लाविलें.

विठ्ठलपूजनाबद्दल साईंना फार आदर; आणखी असेंच एक सुंदर कथानक ऐकून तुम्हास आनंद होईल. भगवंतराव क्षीरसागर नांवाचे एक गृहस्थ होते. त्यांचे वडील भक्त असून आपल्या आवडत्या देवाच्या भेटीसाठीं वारंवार ते पंढरपूरास जात असत.

घरांत एक विठ्ठलमूर्ती होती. वडील वारल्यानंतर भगवंतरावांनीं पूजा नैवेद्याला फाटा दिला. वडिलांची श्राद्धतिथीही घातली नाहीं. व कधीं पंढरपूरची वारीही केली नाहीं. भगवंतराव शिर्डीस येतांच बाबांना त्यांच्या वडिलांचें स्मरण होऊन ते म्हणतात, 'तो माझा दोस्त होता आणि हा त्या माझ्या दोस्ताचा मुलगा; म्हणूनच याला मी येथें खेंचित आणिलें आहे. हा पूजानैवेद्य करीत नसून मला उपाशी ठेवीत आहे. विठ्ठलाला उपाशी ठेवतो म्हणून याला मी शिरडीस आणिलें आहे. आतां त्याला मागची आठवण देऊन पूजेला लावीन.'

एका विशेष पर्वाच्या वेळीं दासगणूंना प्रयाग तिर्थीत जाऊन गंगास्नान करण्याची इच्छा झाली. त्याप्रमाणें ते बाबांची आज्ञा मागण्यास आले. बाबा उत्तर करतात, 'अरे, कशाला इतकें दूर जावयाचें ? हेंच आपलें प्रयागतीर्थ. मनांत दृढ विश्वास धर.' काय कौतुक सांगावें. दासगणूंनीं बाबांचें पायांवर मस्तक ठेवतांच बाबांच्या पायांच्या दोन्हीं आंगठ्यामधून पाणी निथळूं लागलें. जणूं काय गंगा यमुनांचें पाणी पाझरूं लागलें ! तो चमत्कार पाहून दासगणूंना गहींवरून आलें. डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले. बाबांचें किती मोठे उपकार ! त्यांचें हृदय प्रेमानें उचंबळून आलें. तत्क्षणींच त्यांना स्फूर्ती येऊन बाबांच्या अघटित लीलांचें व अगाध शक्तीचें वर्णनपर पद करूनच त्यांना समाधान लाभलें. दासगणूंचें हें पद फारच गोड व प्रासादिक आहे व तें आपणा सर्वांचें कोड पुरविण्याकरितां पुढें देऊन ही गोष्ट पुरी करतों.

**अगाध शक्ति अघटित लीला तव सद्‌गुरुराया ।**
**जडजीवातें भवि ताराया तूं नौका सदया ॥ ध्रु० ॥**
**वेणीमाधव आपण होऊन प्रयाग पद केलें ।**
**गंगा यमुना द्वय अंगुष्ठी प्रवाह दाखविले ॥ १ ॥**
**कमलोद्भव कमलाकर शिवहर त्रिगुणात्मक मूर्ती ।**
**तूंची होऊनी साईसमर्था विचरसी भूवरती ॥ २ ॥**
**प्रहर दिसाला ब्रह्मासम तें ज्ञान मुखें वदसी ।**
**तमो गुणाला धरूनी रुद्ररूप कधीं कधीं दाखविसी ॥ ३ ॥**
**कधीं कधीं श्रीकृष्णासम त्या बाललिला करिसी ।**
**भक्तमनासी सरस करूनी मराळ तूं बनसी ॥ ४ ॥**
**यवन म्हणावें तरी ठेविसी गंधावर प्रेमा ।**
**हिंदू म्हणूं तरि सदैव बससी मशिदिंत सुखधामा ॥ ५ ॥**
**धनिक म्हणावें जरा तुला तरि भिक्षाटण करिसी ।**
**फकिर म्हणावें तरी कुबेरादानें लाजविसी ॥ ६ ॥**
**तवौ कसा तें मशिद म्हणूं तरि वन्ही ते ठाया ।**
**धुनित सदा प्रज्वळीत राहे उदि लोकां द्याया ॥ ७ ॥**

सकाळपासुनी भक्त साबडे पूजन तव करिती ।
माध्यान्हीला दिनकर येतां होत असे आरती ॥ ८ ॥
चहूं बाजूंना पार्षद्गणसम भक्त उभे राहती ।
चौरि चामरें करीं धरूनी तुजवर ढाळीती ॥ ९ ॥
शिंग घड्याळें सूर सनया दणदणते घंटा ।
चोपदार ललकारिती द्वारीं घालुनियां पट्टा ॥ १० ॥
आरती समयीं दिव्यासनि तूं कमलावर दिससी ।
प्रदोषकाळीं बसुनि धुनि पुढें मदन दहन होसी ॥ ११ ॥
अशा लिला त्या त्रयदेवांच्या प्रत्यहिं तवठायीं
प्रचीतीस येताती अमुच्या हे बाबा साई ॥ १२ ॥
ऐसें असतां उगीच मन्मन भटकत हें फिरतें ।
अतां विनंती हीच तुला बा स्थीर करी त्यातें ॥ १३ ॥
अधमाधम मी महापातकी शरण तुझ्या पायां ।
अलों, निवारा दासगणूंचे त्रिताप गुरुराया ॥ १४ ॥

असो, आपलीं पापें धुण्याकरितां जन गंगेकडे जातात आणि आपणांस झालेला विटाळ नाहींसा करण्यासाठीं, गंगा संतांच्या चरणांस लागते. अशाःया पवित्र चरणांना सोडून गंगा–गोदा यात्रा होणार नाहींत. म्हणूनच हें गोड साईचरित्र भक्तीनें श्रवण करा. चंद्रभागेमध्यें गोणाईला नामदेव सांपडले आणि कमालास सुदैवानें गंगेंत शिंपल्याच्या आंत कबीर प्राप्त झाले. त्याचप्रमाणें हे श्रीसाईनाथ सोळा वर्षांचे असतांना भक्तांसाठीं शिरडी गांवांत निंबवृक्षाच्या तळीं प्रगट झाले. प्रगटतांच पूर्णब्रह्मज्ञानी असे ते होते. विषयवासना त्यांच्या स्वप्नीं नाहीं. त्यांनीं मायेला लाथेनें दूर केलें असून मुक्ती त्यांच्या चरणाजवळ नम्र झाली आहे. बाबांचा जन्म कोणत्या गांवीं झाला, ते कोणत्या वंशांत जन्मास आले आणि त्यांच्या आईबापांबद्दल कोणास कांहींच माहिती नव्हती. त्यांची पूर्वावस्था काय होती, त्यांची मातापितरें कोण होती, याबद्दल विचारतां विचारतां लोक थकून गेले. कोणास कांहींच पत्ता लागत नाहीं. आपले आईबाप, आप्त गणगोत आणि जातपात सोडून आणि सर्व संसाराचा त्याग करून लोकांच्या हितासाठीं श्रीसाईबाबा शिरडीस प्रगट झाले. शिरडीच्या नाना चोपदाराची वृद्ध आई साईबद्दल नवलाईच्या गोष्टी सांगत असे. हें गोरें गोमटें सुंदर पोर निंबतळीं आसन घालून स्थिर नजर लावून बसलेलें प्रथम दृष्टीस पडलें असें ती सांगत असे. ( अपूर्ण )

---

सद्गुरु संस्कारापासून मुक्त असल्यामुळें स्वतः शरिराहून भिन्न असल्याची त्यांस सदैव जाणीव असते. ईश्वरी इच्छा व्यक्त करण्यासाठीं ते स्वतःच्या देहाचा केवळ साधन म्हणून उपयोग करण्यांत सद्गुरुला परमात्मा व सृष्टि यांच्या सत्य स्वरूपाचें ज्ञान असतें.

—मन्थन






तारेचा पत्ता : 'ABHAY' Hyderabad. टेलिफोन नं. ४६३८

# हैद्राबाद सॅनेटोरियम

**खास क्षयरोग्यांसाठीं !**

हवेशीर आधुनिक सुखसोयींनीयुक्त अत्यंत माफक दर असलेलें व साईभक्तांनीं चालविलेलें एकमेव ठिकाण.

पुण्याहून रेल्वेनें फक्त बारा तासांचा प्रवास.

**गरीब साईभक्तांसाठीं खास सवलत**

विशेष माहितीकरितां खालील पत्त्यावर लिहा :—

**सुपरिंटेंडंट हैद्राबाद सॅनेटोरियम,**
**रमतापूर, हैद्राबाद १३. [ आंध्र प्रदेश ]**








★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते. त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते!

★

आणि म्हणूनच

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स, ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५२४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई
टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनी तयार केलेले श्री साईबाबांचे तीन रंगी चित्र, द्वारकामाई व इतर एक रंगी फोटो—साईज १० × ८, १० × १४, १४ × २० व पोस्टकार्ड साइज खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री. सगुण मेरु नाईक**

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर


मुद्रक : श. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक : ना. आ. सावंत, [illegible]


श्री साईलीला
५० न.
१९६०

स्थापना १९१६




सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईंतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २



# श्री साई वाक्सुधा

देवाच्या दारीं मानसन्मान व्हावा. त्या मानाची मातब्बरी आहे. पदर पसरायचा तर तो देवापुढें पसरावा. माणसांपुढें पसरून काय मिळणार आहे ? त्याचा प्रसाद मिळविण्यासाठीं नेहमीं झटावें. तोच चिरंतन काळ टिकणारा असतो. लौकिकदृष्ट्या मिळणारे मानसन्मान क्षणिक असतात. लोकांनीं कांहीं ना कांहीं कारणांमुळें तुझा मानसन्मान केला तर तेवढ्यानें हुरळून जाण्याचे कांहीं कारण नाहीं. तुझें लक्ष तुझ्या आराध्य देवाकडे सदैव असावें. आयुष्यांतील चढउतारांनीं आनंदी किंवा दुःखीकष्टी होऊं नये. मन एका जागीं स्थीर करावें. हें जें देवभक्तीचें ध्येय आहे तें सदैव दृष्टीसमोर असावें. त्यांत रंगून जाण्यांत गोडी वाटावी. सर्व इंद्रियांचें लक्ष त्या एकठायीं केंद्रीभूत व्हावें; मनाला तेंच एक वेड लागावें. इतर कोणत्याहि गोष्टींत मन रंगू नये किंवा कशाचीहि गोडी वाटूं नये. मनाचें एकच लक्ष असावें; एकच चिंतन असावें. माझें नामस्मरण हेंच सर्वस्व होऊन रहावें व इतर सर्व गोष्टींचा विसर पडावा. 'सदैव ऐसें भजन घडो। इतर कांहींही नावडो। मन मन्नामस्मरणीं जडो। विसर पडो अवघ्यांचा ॥'

—श्रीसाईसच्चरित (अ. ६ वा.)


[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ३८ वें ] जून १९६० [ अंक २ रा

: संपादक :

**नागेश आत्माराम सावंत**

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. २५१२७४

: कार्यालय :

ईस्ट ॲण्ड वेस्ट इं. कं. बिल्डिंग, ४९।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुं. १

# प्रिय वाचक—

'भाव तसा देव' हें वाक्य आमच्या नेहमीं जिव्हेवर खेळत असतें; परंतु तें अंतर्यामापर्यंत मात्र सहसा जाऊन पोहोंचत नाहीं. जशी आपण भावना बाळगावी तसें त्याचें फळ पदरांत पडतें. या ठिकाणीं भाव हा शब्द श्रद्धा अर्थानें वापरण्यांत आलेला आहे. जशी तुमची श्रद्धा असेल, तसें तुम्हीं होतां; परंतु मनुष्यानें श्रद्धेचा आश्रय हा केलाच पाहिजे. जेथें श्रद्धा नाहीं तेथें आस्था नाहीं, तळमळ नाहीं. आणि जेथें तळमळ नाहीं तेथें कांहींच नाहीं.

आमच्यापैकीं पुष्कळांचें जीवन श्रद्धाहीन असतें. आयुष्य कसें तरी ढकलावयाचें हा असतो त्यांचा निर्माल्यवत् जीवनक्रम. त्यांत जिवंतपणा किंवा चैतन्य मुळींच नसतें. त्या जीवनाला का मानवी जीवन म्हणावयाचें ? तुम्हीं कांहीं करा, कोणतेंही कार्य हातीं घ्या. त्याच्यामागें श्रद्धेचें पाठबळ हें असलेंच पाहिजे. ज्या प्रमाणांत तें पाठबळ असेल त्या प्रमाणांत तुम्हीं यश संपादन कराल.

'भाव तसा देव.' तुम्हीं आपल्या हातीं घेतलेल्या कार्यांत घवघवीत यश मिळविणें हा एक दैवी चमत्कारच आहे. तो चमत्कार तुम्हीं श्रद्धेच्या बळावर पार पाडून दाखवूं शकतां. ज्याची जशी श्रद्धा असेल तसें त्याला फळ मिळतें; आजकाल रोजच्या व्यवहारांत याचा अनुभव आपण घेत आहोंत. बाबा म्हणतात, 'तुम्हीं कोणी कुठेंहीं असा भावें मजपुढें पसरितां पसा । मी तुमचिया भावासरिसा रात्रंदिसा उभाच ॥

स्थळाचा, काळाचा वा व्यक्तीचा येथें संबंध नाहीं. कोणत्याही देशाच्या कोणत्याही भागांत तुम्हीं असा; तुम्ही कोणत्याही समाजाचे घटक असा; तुम्हीं जें कांहीं कराल, जें जें हातीं घ्याल तें तें माझ्या आठवणीनें, माझ्यावर संपूर्ण भाव ठेऊन करा; एवढें केलेंत म्हणजे तुमच्या पुढील यशाची चिंता वहाणारा मीं आहें.

तुमच्याकडून अपेक्षा आहे ती श्रद्धेची. ती श्रद्धा वरवरची नको; ती अंतःकरणापासून जन्माला आलेली श्रद्धा पाहिजे. तेवढें लेणें तुम्हीं घातलेंत मग मी तुमच्यापासून दूर नाहीं. मग माझें घर तुमच्या अंतःकरणांतच आहे म्हणून समजा; मग मी आणि तुम्हीं वेगळे नाहीं. श्रद्धेच्या बळावर एवढी एकतानता साधतां आल्यावर या जगांत तुम्हांला काय उणें पडणार आहे? माझ्या अस्तित्वाची जाणीव झाल्यावर मग तुम्हांला उणीव कसली भासणार आहे ?

'भाव तसा देव' असें आहे श्रद्धेचें महत्त्व. आजवर होऊन गेलेल्या साधुसंतांनीं आपणांस हेंच सांगितलें आहे. 'भाव धरा रे । अपुलासा देव करा रे॥ तुम्हांला देव हवा आहे? तुम्हांला देवाच्या ठायीं असलेले उच्च गुण प्राप्त करून घ्यावयाचे आहेत? तुम्हांला देवत्व मिळवायचें आहे? मग भावाला गच्च मिठी मारा. कशावर तरी बळकट श्रद्धा ठेवा.

कितीही संकटें आलीं तरी श्रद्धेची नाव तुम्हांला यशस्वी रीतीनें पैलतीराला घेऊन जाईल हें निश्चित समजा.

बाबानीं तुमची श्रद्धा कशावर आहे हें पाहिलें नाहीं. तुमच्याठायीं जिवंत रसरशीत श्रद्धा आहे कीं नाहीं हेंच पाहिलें व आजही ते त्याच दृष्टीनें पहात आहेत. तुमची श्रद्धा श्री साई सच्चरितावर आहे कीं गुरुचरित्रावर आहे, या गोष्टीला त्यांनीं महत्त्व दिलें नाहीं. त्यानीं महत्त्व दिलें जातिवंत, जिवंत श्रद्धेला.

'कोणास अध्यात्म रामायण । कोणास ज्ञानेश्वरी पुरश्चरण । कोणास हरिवरदा पारायण । गुरुचरित्रावलोकन कोणातें ॥ कोणा बसविती पायाजवळी ॥ कोणास खंडो-बाच्या देऊळीं । कोणाच्या विष्णु सहस्रनामावळी । बांधिती गळीं कळकळीनें ॥'

किती व्यापक व सर्वव्यापी क्षेत्र आहे हें! प्रत्येकाची आवड निवड कांहीं सारखी नसते. व्यक्ति तितक्या प्रकृति! कोणाला काय आवडतें तर कोणाला काय आवडतें! परंतु आवडी निवडी भिन्न व वेगवेगळ्या असेनात का. त्या सर्वांना व्यापून रहाणारा सर्वांनाच एकाच सूत्रांत गोवणारा व जरूर त्या राजमार्गावर आणून सोडणारा एक महत्तम गुण आम्यावर असला म्हणजे झालें. आणि तो महान् गुण म्हणजेच भाव किंवा श्रद्धा. तुम्हांला देवत्वाप्रत घेऊन जाणारी खात्रीची व सर्वश्रेष्ठ शिडी म्हणजे श्रद्धाच होय.

× × ×

श्री साईबाबासंबंधींचा भक्तिभाव उत्तरोत्तर वाढत चालला आहे. त्यांच्यासंबंधीं कुठें कांहींही असो; त्याकडे सहाजिकच भक्तगण मोठ्या प्रमाणांत आकर्षिला जातो. त्यामुळें कित्येक लोकांस आपला स्वार्थ साधण्यास ही उत्तम संधि आहे असें वाटतें. त्यांच्या नांवाचा फायदा मिळविण्यासाठीं कांहीं ना कांहीं हालचाली नेहमीं चाललेल्या असतात. कोणी 'साई दरबार' भरवितात, 'द्वारकामाई' उभी करतात तर कोणी काय करतात. अशा या प्रयत्नांशीं श्रीसाईबाबांच्या शिरडी संस्थानचा कोणत्याही प्रकारें संबंध नसतो. श्री साईबाबांच्या किंवा द्वारकामाईच्या नावानें कोणी कांहीं करूं लागला तर कोण कोणाचा हात धरूं शकत नाहीं; परंतु कोणाही साईभक्ताचा वृथा गैरसमज होऊं नये व साईबाबांच्या शिरडी संस्थानचा अशा प्रकारांशीं संबंध आहे असें उगाच कोणाला वाटूं नये, एवढ्यासाठीं हा जाहीर खुलासा करण्यांत येत आहे — संपादक

———




## एक साधा परंतु अर्थपूर्ण अनुभव

श्री. के. के. देसाई, सेंट पिटर्स हायस्कूल, पंचगणी, जि. उ. सातारा; हे लिहितात कीं, मी माझा एक साधाच पण अर्थ भरलेला अनुभव पाठवीत आहे; तो प्रसिद्ध करण्यास योग्य असल्यास प्रसिद्ध करावा तो असा.

माझ्या शाळेला उन्हाळ्याची पंधरा दिवसांची सुट्टी पडली होती. सुट्टींत कोल्हापुरला जावें असें म्हणत होतों. जाण्याची घाई होती. सुटी दि. ५ ते १९ पर्यंत होती. परीक्षा ४ पर्यंत संपत नव्हती. त्यामुळें दि. ७, ८ पर्यंत निघण्याचें शक्य दिसत नव्हतें. तरी पण प्रयत्न म्हणून माझ्या साहाध्यायांना पेपर तपासून लौकर देण्याबद्दल विनंती केली. मला तें शक्य दिसत नव्हतें; तरी पण बाबांना विनंती केली आणि अशक्यांतलें शक्य झालें. मला पेपर तपासून मार्क मिळाले आणि मी दि. ६ ला निघूं शकलों.

दुसरें असें कीं, मी सकाळीं कोल्हापूरला जातांना सातारला गाडी बदलावी लागते. मला गाडींत समजलें कीं, लग्नाचा मोसम आहे जागा मिळणें शक्य नाहीं आणि तें खरेंहि होतें. ज्याप्रमाणें पहिलें संकट बाबांनीं सांवरलें त्याचप्रमाणें बाबा हेंहि संकट घालवतील अशी पक्की खात्री होती. माझा तोच एकमेव आधार होता. मी मनोभावें प्रार्थना करून त्यांना अडचण सांगितली. मी साताऱ्याला ११–२५ वाजतां आलों. पुणें–कोल्हापूर गाडी तयार होती. आणि दाराजवळ २५–३० माणसांचा घोळका उभा होता. जागा मिळणें शक्यच नाहीं ही खात्री झाली. पण बाबांचा चमत्कार पहावयाची ती वेळ होती. पुणें–कोल्हापूर तिकीट काढलेला एक माणूस कांहीं कामामुळें पुढें जाऊं शकत नव्हता. मला आपणहून तिकीट विचारलें. मी तर चाटच पडलों. बाबांनीं माझ्या हांकेला ओ दिली होती. तिकिटाचे पैसे देण्याकरतां मी गडबडीनें त्याला जास्त पैसे दिले. पण त्या बाबारूपी सद्‌गृहस्थानें जास्त गेलेले पैसे मला हांक मारून परत दिले. गाडींतील सर्व प्रवासी आश्चर्यानें थक्क झाले होते. त्यांना बाबांच्या ह्या चमत्काराची कल्पना नव्हती. मीच फक्त तो चमत्कार जाणत होतों. गर्दींमध्यें २५–३० माणसें असतांना फक्त मलाच तिकीट पाहिजे कां म्हणून विचारणारा गृहस्थ बाबांच्या कृपेमुळें लाभला असें दर्शवितें. त्या गृहस्थाच्या रुपानें बाबाच मला भेटले. मला बसायला त्यानें रिझर्व्ह केलेली जागाच मिळाली. श्रीबाबांचा लीला अगाध आहे म्हणतात तें कांहीं खोटें

नाहीं. गाडींत बसल्यावर बाबा मला लौकर जायचें आहे पोंचवाल ना? म्हणून केलेली विनंती बाबानीं अक्षरशः पाळली. नेहमींप्रमाणें २–३० ला पोहोंचणारी गाडी १–१० लाच कोल्हापुरास पोहोंचली. प्रवासांत मी त्यांचा चरित्र ग्रंथ वाचीत होतों.

असे लहान मोठे अनुभव मी घेतलेले आहेत. पण भक्त मंडळींना बाबांच्या जागृतपणाची जाणीव देण्यासाठीं म्हणून मी वरील अनुभव सांगितला आहे.

× × ×

## साईबाबा देगा, हम लेगा—

श्री. वा. रं. गोखले, व्हल्कन इन्शुअरन्स कं. पुणें शाखा, पुणें २ हे लिहितात कीं,

पुढील घटना सुमारें दोन वर्षांपूर्वी घडलेली असून, त्यावेळीं मी शिरडी येथें रहात होतों. श्रीक्षेत्र शिर्डी येथें यात्रा बरीच जमलेली होती. सकाळपासून भक्तांची मुंग्यांसारखी रांग श्रीबाबांच्या दर्शनाकरितां लागून राहिली होती. सकाळीं ८ वाजण्याच्या सुमारास एक वृद्ध बाई वय अदमासें ७०–७२ असलेली लेंडी बागेपासून समाधी-मंदिराच्या प्रवेशद्वारापर्यंत सारख्या फेऱ्या मारूं लागली व तोंडानें 'साईबाबा देगा हम लेगा–तुम क्या देगा हम क्या लेगा' सारखे म्हणूं लागली. त्यांत मुळींच खंड पडत नव्हता. वाढत्या गर्दीमुळें पोलीसांनीं तिला हांकलून लावण्याचा प्रयत्न केला. तरीहि लेंडी बागेपासून सगुण मामा नाईकांच्या दुकानापर्यंत ती फेऱ्या मारूं लागली. फेऱ्या न थांबतां सारखी मारीत होती. दुपारीं १२ वाजले, २ वाजले भक्तांनी तिला खाण्याचा आग्रह केला, कोणी चहा देऊं लागले. कोणी काय पाहिजे म्हणून विचारूं लागले. पण त्याकडे ती नुसती बघायला सुद्धां तयार नव्हती. दुपारी ४ चे सुमारास एक साईभक्त स्वतःची गाडी घेऊन शिर्डीस आले. बाबांना हार घातला. व दर्शन घेऊन मुंबईस परत जाण्यास निघाले. गाडी कोपरगांव येथें गेली असेल. तों त्यांनीं गाडी परत शिर्डीस आणली ( काय झालें असेल तें त्यांचें त्यांना ठाऊक ) व थेट त्या फेऱ्या मारणाऱ्या बाईच्या जवळ आणून उभी केली व तिला विचारलें, 'तुझा सवाल काय आहे?' बाईनें तोंड उघडलें व सांगितलें माझा सवाल ६१ पावल्यांचा आहे. त्या गृहस्थानें ६१ पावल्या त्या बाईला दिल्या व तो मुंबईचा मार्ग क्रमूं लागला. ती बाईही ६१ पावल्या मिळतांच तोंडानें 'साईबाबा देगा हम लेगा, तुम क्या देगा हम क्या लेगा' म्हणत शिर्डीतून बाहेर पडली ती पुन्हा शिर्डीस दिसली नाहीं.

× × ×

## उदीचा प्रभाव

सौ. नीला एन्. चौबळ C/o एन्. जी. चौबळ, अकाउंटंट जनरल ऑफिस, क्वीन्स रोड, मुंबई नं. १, ह्या लिहितात—

१९५३ सालीं मे महिन्यांतील एक अनुभव येथें सांगत आहे. १९५२ सालीं मी मॅट्रीक पास झालें व त्यानंतर कांहीं तरी उद्योगाला लागावयाच्या बेतांत होतें. शक्यतों

नोकरीच पत्करावी अशा विचारांत होतें. परंतु पास झाल्यावर मग बरेच दिवस म्हणजे जवळ जवळ वर्षभर घरींच बसावें लागलें. कारण नोकरी कांहीं मिळाली नाहीं व मन अस्वस्थ झालें. कारण मनाला विरंगुळा कांहींतरी हवा होता ना? इतर गोष्टींत लक्ष घालण्यांस मन तयार नव्हतें.

अशा प्रकारें दिवस जात असतां मला हळुहळू एकाकी कांहीं कारण नसतां ताप येऊं लागला. प्रथम प्रथम माझ्या तें लक्षांत आलें नाहीं. परंतु पुढें जेव्हां ताप वाढूं लागला तेव्हां त्याची जाणीव होऊं लागली. घरच्या मंडळींनीं माझी तब्येत आमच्या खाजगी डॉक्टरांस दाखविली. डॉक्टरांनीं ताप साधाच आहे असें सांगून औषध वगैरे दिलें. परंतु औषधानें ताप हटेना. तेव्हां त्यांनीं इंजेक्शनें सुरू केली. तरी ताप रोज येत होता. शिवाय सुरुवातीला अंगावर ताप काढल्या-वर मात्र मनांतून मी फार घाबरून गेलें होतें. दिवसेंदिवस मला भयंकर अशक्तपणा वाढूं लागला. व दुखणें कोणत्या तरी रोगावर जातें कीं काय याची काळजी वाढूं लागली. खाणें पिणें तर कांहींच जात नव्हतें व उठून बसण्याचीसुद्धां ताकद राहिली नाहीं. डॉक्टरसुद्धां मनांतून आश्चर्य करूं लागले.

अशा प्रकारें बऱ्याच दिवसांनंतर माझ्या तापाला उतार पडत चालला. परंतु अशक्तपणा इतका वाढत चालला होता कीं, नुसती पावलें टाकीत असतांनासुद्धां हात पाय थरथरायचे. ही काय भानगड आहे याचें मला आश्चर्य वाटूं लागलें. औषध पाणी तर चालूं होते. मी मनांतून बाबांची सारखी करुणा भाकत असें. कारण शिरडीस जाऊन आल्यापासून बाबांवर माझी पूर्ण श्रद्धा बसली होती. त्यामुळें औषध पाण्याला कंटाळून आतां कोणतेंच औषध घ्यावयाचें नाहीं व एकाच औषधावर विश्वास ठेवायचा आणि तें म्हणजे श्री बाबांची उदी. कारण आजपर्यंत श्री साईबाबांच्याच कृपेनें सर्व ठीक चाललेलें आहे. खरोखर बाबांची लिला अगाध आहे.

एके दिवशीं सहज बाबांच्या तसबिरीजवळ हात जोडून मी उभी राहिलें व म्हटलें बाबा आतां तुमच्या उदीशिवाय दुसरें औषध दिसत नाहीं. (कारण डॉ. च्या औषधानें आराम वाटत नव्हता.) तेव्हां आजपासून मी तुमची विभूति पाण्यांत घालून घेत जाईन. आणि ती घेऊन तरी मला बरें वाटलें पाहिजे! अशी बाबांजवळ मनापासून प्रार्थना केली. तेव्हांपासून मी दररोज उदी पाण्यांत घालून घेण्यास सुरवात केली. आणि काय आश्चर्य! माझी प्रकृति हळूहळू सुधारत जाऊन प्रकृतीला थोडासा आराम पडूं लागला. मनांतु बाबांचें सारखे आभार मानूं लागलें. आणि आज बाबांच्या कृपेनें माझी प्रकृति चांगली आहे. किरकोळ आजाराखेरीज मोठें दुखणें वगैरे कांहीं झाले नाहीं. व आपण ह्या आजारांतून बरे होऊं की नाहीं ही जी मनांत शंका होती ती पार नष्ट झाली, ही सर्व बाबांचीच कृपा. त्यानंतर एकच वर्षानें माझें लग्न जमून मला चांगलें स्थळ मिळालें. व आतां एका मुलीसह मी सुखांत आहे. खरोखर बाबांचा महिमा

वर्णावा तेवढा थोडाच आहे. जो जो भज भजे जैसा जैसा भावें ।तैसा तैसा पावे मीही त्यासी ह्या बाबांच्या वचनाचें प्रत्यंतर माझ्या बाबतींत तरी खरें ठरलें आहे.

× × ×

**नवस फळाला आला—**

श्री. प्रभाकर कृष्णाजी उपरकर बे. ल. चाळ, ३ रा माळा, खो. नं. ३३६; ७५ बेलव्हेडर रोड माझगांव मुं. नं. १० हे लिहितात कीं, मी एक साईसेवक आहें. मला श्री. साईबाबांकडून बरेच अनुभव मिळाले आहेत. त्यांपैकीं दोन अनुभव मी देत आहे:—

मी ज्यावेळीं नोकरी करून शिकणारा विद्यार्थी होतों त्यावेळची ही हकीकत आहे. मी पहिल्या वेळेस म्हणजे मार्च १९५६ मध्यें एस. एस. सी. परीक्षेस बसलों आणि नापास झालों. त्यानंतरही लागोपाठ ३ वेळां परीक्षेस बसलों. परंतु पास होण्याचें चिन्ह कांहीं दिसेना, हें पाहून मला फार वाईट वाटे व मला माझ्या आईनें सांगितलेली गोष्ट आठवूं लागे. ती म्हणजे आम्ही गांवीं असतांना तिला एका ज्योतिष्यानें असें सांगितलें होतें कीं माझें शिक्षण वयाच्या १४ वर्षांपर्यंत सुरळीत होईल त्यानंतर मी अधिक शिकेन असें सांगतां येत नाहीं. परत मी १९५९ मार्चला म्हणजेच वयाच्या २३ व्या वर्षी परीक्षेस बसण्याचें ठरविलें, तेव्हां माझे आई वडील दोन तीन ज्योतिष्यांकडे गेले व माझ्याबद्दल विचारलें तर त्यांनी सांगितलें कीं जर तुम्ही ग्रहशांति करितां जप व दान वगैरे कराल तर कदाचित् हा पास होऊं शकेल, नंतर माझे वडील त्यांचे गुरु डॉक्टर के. म. गव्हाणकर ( कुर्ला ) यांच्याकडे गेले व त्यांना माझी जन्मपत्रिका दाखवून त्यांस विचारलें कीं माझा मुलगा. परत परीक्षेस बसणार आहे तरी त्याबद्दल तुम्हांस काय वाटतें ? तेव्हां पत्रिकेवरून त्यांनीं सांगितलें कीं हा कांहीं पास होणार नाहीं. कारण याच्या जन्मग्रहीं राहू आहे;परंतु जरा तुम्ही पत्रिकेचा विचार सोडून बाबांवर श्रद्धा ठेवलीत तर मागें तुम्हास अनुभव आले त्याचप्रमाणें तुमचा मुलगा पास होईल, परंतु त्याला मात्र पत्रिकेची हकिकत सांगूं नये व त्यास प्रयत्न व बाबांची सेवा चालू ठेवण्यास सांगणें. त्याप्रमाणें आई–वडिलांनीं मला बाबांची सेवा व ( अभ्यासाचा ) प्रयत्न चालू ठेवण्यास सांगितलें. नंतर मी बाबांना असा नवस केला कीं मी पास झाल्यावर शिर्डीस येवून ५नारळाचें तोरण बांधीन व १ रत्तल खडीसाखर वाटीन. त्याचप्रमाणें मी चहा सोडला व पास झाल्यानंतर शिर्डीस जाऊन समाधीचें दर्शन घेतल्यावर चहा पिण्याचें सुरू करावयाचें असा संकल्प केला. तसेंच माझ्या आईनेंही मी पास व्हावें म्हणून चहा सोडला व वरील प्रमाणेंच संकल्प केला.

त्या नंतर बाबांच्या कृपेनें मी मार्च १९५९ च्या परिक्षेंत पास झालों. मी व आई जुलै १९५९ मध्यें शिर्डीस जाऊन नवस फेडले. शिर्डीस गेल्यावर मी बाबांना प्रार्थना केली कीं जर मला २५ डिसेंबर १९५९-च्या पूर्वी क्लार्कची नोकरी मिळाली तर

मी २५ डिसेंबरच्या आंत परत शिर्डीस येऊन समाधीचें दर्शन घेईन. नंतर मी मुंबईस परत आल्यावर साईचरित्र वाचण्यास आरंभ केला. चरित्र वाचून पूर्ण झाल्यानंतर क्लार्कची नोकरी मिळाली. नंतर मी ता. २०–१२–५९ रोजी शिर्डीस जाऊन समाधीचें दर्शन घेतलें व मागील वेळेस विस्मृती मुळें ५ नारळांचें तोरण बांधण्याचा व खडी-साखर वाटण्याचा नवस राहिला होता तो फेडला.

या पूर्वीची नोकरी सुद्धा मला बाबांच्या कृपेनें मिळाली होती, त्यावेळीं माझ्या बहिणीनें बाबांच्या चरित्रांचें ७ दिवसांत ( सप्ताह ) पारायण केलें होतें.

अशी आहे आमुची साई माउली । सेवकांवरी असे नेहमी कृपेची साउली ।।

= = =

## शरीर स्वास्थ्यासाठीं प्रार्थनेची जरुरी

मानवी जीवनांत प्रार्थनेचें महत्त्व फार मोठें आहे. जीवन उत्तम प्रकारें जगायचें तर त्याला प्रार्थनेच्या संस्कारांत गुरफटून ठेवलेंच पाहिजे. आत्म्याच्या उन्नतीसाठीं, हृदय उल्हसित रहाण्यासाठीं, भावना चेतविण्यासाठीं प्रार्थनेची जरुरी फार आहे. रोज श्रमणाऱ्या, भागणाऱ्या जीवाची प्रार्थना ही विश्रांति आहे. शरिराला रोज द्यावें लागणारें तें एक अन्नच आहे म्हणा ना. तें जसें आवश्यक अन्न आहे, तसेंच शरिरांतील मळ धुवून काढणारें पवित्र गंगास्नानही आहे.

आपण स्नान कशासाठीं करतों ? निर्मळ व स्वच्छ होण्यासाठींच की नाहीं ? त्याच-प्रमाणें प्रार्थनेचीही फार जरुरी आहे. मनांत नाना प्रकारच्या वासना उद्भवतात, थैमान घालतात त्यांना शांत करण्यासाठीं, तें थैमान थांबविण्यासाठीं प्रार्थनेची जरुरी आहे. शारीरिक श्रम केल्यानंतर झोपेची व विश्रांतीची जरुरी भासते व ती आपण घेतोंही. त्याचप्रमाणें नाना प्रकारच्या वासनांच्या आहारीं गेल्यानंतर व नाना संकल्प, विकल्प करून थकल्या-भागल्यानंतर प्रार्थनेची कास धरणें अत्यावश्यक आहे. शरीर धारणेसाठीं आपणास रोजच्यारोज अन्न घ्यावें लागतें, एकदांच घेऊन भागत नाहीं; त्याचप्रमाणें अंतःकर-णांतील खळबळ, मळमळ व तळमळ थांबविण्यासाठीं शरिराला प्रार्थनेचें पक्वान्न वारंवार पुरवीत राहिलें पाहिजे.

— काका कालेलकर

# ना. बाळासाहेब सावंत यांचें अभिनंदन

गेलीं तेरा वर्षें शिरडी संस्थान समितीचें अध्यक्षपद उत्तम प्रकारें शोभविणारे त्याच प्रमाणें गेलीं ८–९ वर्षें संस्थानच्या विश्वस्त पदावर असलेले श्री. पी. के. ऊर्फ बाळासाहेब सावंत यांची नवमहाराष्ट्राच्या मंत्रिमंडळांत निवड झाल्याबद्दल शिरडी संस्थान समीतीला त्याबद्दल सहर्ष अभिमान वाटणें स्वाभाविक आहे.

शिरडी संस्थान समितीची एक सभा मुंबईत संस्थानच्या कचेरींत दिनांक ७ मे १९६० रोजीं भरली असतां ना. बाळासाहेब सावंत हे त्या सभेस हजर राहिले होते. त्यावेळीं समीतीचे उपाध्यक्ष श्री. बाजीराव कोते पाटील यांनीं त्यांच्या अभिनंदनपर भाषण करून त्यांना भव्य पुष्पहार व पुष्पगुच्छ समितीतर्फे अर्पण केला. श्री. बाजीराव पाटील आपल्या अभिनंदनपर भाषणांत म्हणाले, 'ना. बाळासाहेब यांची मंत्रिमंडळांत निवड यापूर्वीच होणें उचित झालें असतें. परंतु उशिरां का होईना, आमच्या महाराष्ट्र सरकारनें त्यांची आजवरची निरलस लोकसेवा, जनतेच्या उन्नतीसाठीं त्यांनीं चालविलेलें अविश्रांत कार्य वगैरे गोष्टी लक्षांत घेरून त्यांना मंत्रिमंडळांत घेऊन त्यांच्या सेवेचा जो गौरव केला त्याबद्दल आम्हां सर्वांना आनंद होत आहे. शिरडी संस्थान समितीचे अध्यक्ष व विश्वस्त या नात्यानें त्यानीं आजवर आपली जबाबदारी अत्यंत उत्तमप्रकारें पार पाडिली व समितीचें वेळोवेळीं अचूक मार्गदर्शन केलें याबद्दल त्यांना द्यावे तेवढे धन्यवाद थोडेच होतील. यापुढें आपली अधिकार कक्षा संभाळून ते आमचें मार्गदर्शन करतील व आपल्या ज्ञानाचा फायदा संस्थान समितीला वेळोवेळीं देत राहतील, अशी आशा मी याप्रसंगीं प्रगट करतों.'

यानंतर ना. बाळासाहेब सावंत हे उत्तरादाखल केलेल्या आभारप्रदर्शक भाषणांत म्हणाले, 'आपण केलेल्या गौरवाबद्दल मी आपला आभारी आहे. मला मंत्रिमंडळांत जी जबाबदारीची व मानाची जागा मिळाली ती पूज्य बाबांचीच कृपा होय, असें मी मानतों. नवीन जबाबदारीमुळें संस्थान समितीच्या अध्यक्षपदाचा मी जरी राजिनामा दिला असला तरी सध्या माझ्यावर जी जबाबदारी सोपविण्यांत आली आहे, ती संभाळून व अधिकाराची कक्षा संभाळून शिरडी संस्थानसाठीं मला जें कांहीं करतां येण्यासारखें असेल तें मी जरूर करीन. आपल्या आजवरच्या सहकाराबद्दल व आपण केलेल्या गौरवाबद्दल मी आपला सर्वांचा आभारी आहें.'

त्यानंतर अल्पोपहार होऊन अर्ध्या तासानंतर सर्वांचा प्रेमळ निरोप घेऊन ना. बाळासाहेब सावंत दुसरीकडे निघून गेले.

वर नमूद करण्यांत आल्याप्रमाणें शेतकी खात्याचे मंत्री ना. बाळासाहेब सावंत यानीं शिरडी संस्थान समितीच्या सन्माननीय अध्यक्षपदाचा राजिनामा दिला असून समितीनें त्यांच्यावरील सरकारी जबाबदारी लक्षांत घेऊन तो मोठ्या खेदानें स्वीकारला आहे.

---

# सीतामाईचें उज्वल चारित्र्य

लेखकः—**स. म. ठाकूर** बी. ए. एल्. एल्. बी.

वाल्मीकिरामायणाचे आधारावर सीतामाईचें हें चारित्र लिहावयाचें असल्यामुळें वाल्मीकिऋषींनी रामायणाच्या प्रत्येक कांडांत सीतामाईबद्दल जे उल्लेख केलेले आहेत त्यांना अनुसरून तिच्या चारित्र्याचें क्रमवार अवलोकन करण्याचें योजिलें आहे.

**बालकांड**—सदर कांडांत सीतामाईबद्दल विशेष मजकूर आलेला नाहीं. फक्त सर्ग ७० ते ७३ मध्यें सीतामाईच्य विवाहाचा मजकूर आला आहे. सदरचा मजकूर वाचतां सीतामाईचा रामचंद्रप्रभूंशीं जो विवाह झाला त्याला स्वयंवर म्हणणें हे चुकीचें होईल असें दिसतें. मोठे मोठे किर्तनकार कीर्तनाच्या वेळीं सीतास्वयंवराचें आख्यान लावतात व सीतेच्या स्वयंवराकरितां जनकराजानें दुसऱ्या अनेक राजेरजवाड्यांना आमंत्रणें पाठविलीं होतीं व त्या आमंत्रणांस अनुसरून अनेक देशचे राजे सीतेच्या पाणीग्रहणाच्या आशेनें स्वयंवराकरितां मिथीला नगरींत जमा झाले होते व त्यांत लंकाधिश रावण व अयोध्येचा रामचंद्र हेही होते. अवाढव्य शिवधनुष्य दृष्टीस पडतांच अनेक राजांनीं खालीं माना घातल्या व तें उचलण्याचा प्रयत्न करण्याचा विचारच सोडून दिला. रावणानें तें उचलण्याचा प्रयत्न केला परंतु तें त्याला उचलतां आलें नाहीं उलट तो खालीं पडून तें त्याच्या उरावर पडलें. एकट्या रामचंद्रप्रभूंनीं मात्र तें उचलून सज्ज केलें अशी कथा कीर्तनामध्यें रसाळ वाणीनें सांगितली जाते व पुराणांत आणि कांहीं रामायणांतही ह्या कथेला पुष्टी मिळते. याठिकाणी स्वयंवर शब्दाच्या मूळ अर्थाचा कोणीच विचार केलेला दिसत नाही. स्वयंवर शब्दाचा अर्थ कन्येनें आपल्या आवडीप्रमाणें वराची निवड करावयाची व त्याला वरावयाचें असा आहे.

शिवधनुष्य सज्ज करण्याचा पण सीतेचा नसून जनक राजाचा होता. जो कोणी सदर पण जिंकील त्याला वरणें सीतेला प्राप्त होतें. रामानें पण जिंकला तिनें रामाला वरलें. रावणानें पण जिंकला असता तर रावणाला तिनें वरलें असतें. सीतेच्या आवडीनिवडीला त्यांत मुळींच महत्त्व नव्हतें व म्हणून सीतेनें रामाशीं जो विवाह केला त्याला स्वयंवर म्हणणें चुकीचें होईल; त्याला फार तर ' समाव्हय ' असें म्हणतां येईल. कारण ' निर्जीव वस्तु पणाला लावून जें केलें जातें तें ' द्यूत ' व सजीव वस्तु पणाला लावून जें केलें जातें तें ' समाह्वय ' होय. ' अशी व्याख्या मनुस्मृतींतील अध्याय ९ श्लोक २२३ मध्यें दिली आहे. कायद्याच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे सीता ही सजीव वस्तु होती व ती तिच्या बापानें पणाला लावली होती. या कारणास्तव सीतेचा रामचंद्राशीं झालेला विवाह हा ' समाह्वय ' आहे स्वयंवर नव्हे. व म्हणून सीता स्वयंवर असा शब्दप्रयोग करण्याऐवजीं ' सीता समाव्हय ' असा शब्द प्रयोग करणें युक्त होईल. शिवाय वाल्मीकी

रामायणांत रावण व इतर राजे त्यावेळीं स्वयंवराकरितां जमले होते असा कोठेंच उल्लेख नाहीं.

जनकराजा एक यज्ञ करीत होता. तो यज्ञ पाहण्याकरितां रामचंद्रप्रभूंना बरोबर घेऊन विश्वामित्र ऋषि मिथीला नगरींत गेले व तेथें शिवधनुष्य पहाण्याची त्यांना इच्छा झाल्यामुळें जनकानें तें त्यांना दाखविलें व आपल्या पणाची माहिती दिली. रामचंद्राप्रभूंनीं तें सहाजिक पाहिलें व सज्ज केलें; अशा तऱ्हेनें रामचंद्रप्रभूंनीं पण जिंकल्यामुळें जनकराजा फार आनंदित झाला व पुढें सीतेचा व रामाचा विवाह झाला असें साधें, सरळ वर्णन वाल्मीकि रामायणांत आलें आहे. शिवाय त्यावेळीं सीतेचें वय फक्त ६, ७ वर्षांचेंच होतें. इतक्या ल्हान वयांत मुलीस लग्नाची कल्पना असणें व कोणता वर योग्य व कोणता अयोग्य हें ठरविण्याइतकी तिची बुद्धि प्रगल्भ असणें शक्य नाहीं. ह्या एकंदर कारणां-वरून सीतास्वयवंर असा शब्दप्रयोग आपण उपयोगांत आणीत असतों तो चुकीचा आहे हें स्पष्ट होईल.

**अयोध्याकांड**—या कांडामध्यें सीतामाईच्या चरित्राचा जो भाग आला आहे, त्या भागामध्यें (१) तिचें अतुलनीय पतिप्रेम (२) तिचें आनंदानें हुरळून जाणारें व दुःखानें उद्विग्न न होणारें खंबीर मन व (३) तिचें असामान्य बुद्धिकौशल्य हे तीन गुण प्रामुख्यानें चमकतांना दिसतात. आपल्या पतीला आतां लौकरच राज्याभिषेक होणार, आपण अजूनपर्यंत दशरथाची सुना होतें त्याऐवजी आतां आपणाला राम-राजाचें राज्ञीपद मिळणार, आपला पति अजूनपर्यंत नुसता युवराज होता आतां तो अयोध्येच्या सिंहासनावर बसणार, अशा आनंदाच्या विचारांत सीतामाई असतांनाच रामचंद्रप्रभू तिच्या भेटीस आले व १४ वर्षे वनवासाला जात आहें. भरताला राज्या-भिषेक व्हावयाचा आहे, तूं येथेंच अयोध्येंत रहा व देवाची, माता कौसल्येची, तात दशरथाची व भरताची सेवा कर असें त्यांनीं तिला सांगितलें.

इंद्राच्या सुंदर नंदनवनांत अगर काश्मीरच्या रम्य शालीमार बागेंत किंवा म्हैसूरच्या नयनमनोहर वृंदावन गार्डनमध्यें वास्तव्य करावयास आपणास मिळणार अशा विचारानें एखाद्यानें आनंदित असावें, तोंच सहाराच्या ओसाड वाळवंटांत अगर अंदमान निकोबारच्या निर्जन प्रदेशांत जाऊन रहाण्याचा प्रसंग यावा म्हणजे त्या इसमाच्या मनाची जशी स्थिती होईल किंवा ऋषिकेशच्या गंगातटाकीच्या स्वामी शिवानंदाच्या रम्य कुटींत, पांडीचरीच्या पवित्र आश्रमांतील पूज्य माताजींच्या सान्निध्यांत अगर थिऑसॉफिकल सोसायटीच्या अड्यार येथील शांत, गंभीर व पवित्र प्रार्थनामंदिरांत अगर तेथील वटवृक्षाखालीं जाऊन रहाण्याचें एखाद्या संसारत्रस्तानें ठरवावें तोंच वित्त, वनीता व वारुणी ह्यांच्या समुद्दांत २४ तास घालविणाऱ्या एखाद्या आसूरी व तामसी वृत्तीच्या जनसमुहांत अडकून पडण्याचा त्याच्यावर प्रसंग यावा, तशाच तऱ्हेचा दुर्धर प्रसंग रामचंद्राच्या बोलण्यानें सीतामाईवर आला होता. परंतु सीतेचें मन खंबीर होतें, आपल्या पतीला राज्याभिषेक होणार म्हणून तें पूर्वी हुरळून गेलें नाहीं व आपल्या पतीला

आतां १४ वर्षांचा खडतर वनवास प्राप्त होणार या दुःखद वार्तेनें त्यावेळीं कष्टी अगर दुबळें झालें नाहीं. तिनें आपला धीर सोडला नाहीं. तिच्या डोळ्यांत एकही अश्रुबिंदु आला नाहीं. उलट पक्षीं तुम्ही अरण्यांत जाणार तर मीही तुमच्या बरोबर अरण्यांत येतें असें तिनें आपल्या पतिला सांगितलें.

रामचंद्रप्रभु हे लहानपणीं विश्वामित्र ऋषीबरोबर अरण्यात राहिले होते व म्हणून तेथील गुहांत राहणारी वाघ–सिंहादि भयंकर हिंस्र श्वापदें तेथील रस्त्यावरून जातांना वारंवार दृष्टीस पडणारीं नाग, सर्प वगैरे विषारी जनावरें, तेथील नद्यांतील पाण्यांत व त्यांच्या कांठावर असणाऱ्या अजस्र सुसरी, मनुष्यभक्षक राक्षस वगैरेंची त्यांना पूर्ण कल्पना होती. तेथें रहावयास आश्रयाकरीतां घर मिळणार नव्हतें. खावयास अन्न मिळण्याची मुश्किल होती. वस्त्राकरितां वल्कलाशिवाय मार्ग नव्हता. ह्या सर्व गोष्टी त्यांनी पूर्वीं अनुभवल्या होत्या व त्या त्यांनीं सीतामाईला समजावून सांगितल्या व तूं माझ्याबरोबर वनवासास येऊं नको. मी तुला आपल्या बरोबर नेणार नाहीं असें तिला निक्षून सांगितलें. परंतु रामचंद्राच्या या सांगण्याचा सीतामाईच्या मनावर कांहींच परिणाम झाला नाहीं. तिचें आपल्या पतीवरील प्रेम अढळ होतें. पतीच्या सहवासांत आपणास राहावयास मिळावें व त्याची सेवा करावयास मिळावी त्याकरितां आपणावर कितीही संकटें आलीं तरी त्यांची पर्वा करण्याचें कारण नाहीं असें तिला वाटत होतें व म्हणून 'मी तुमच्याबरोबर येणार. तुम्हीं आपल्याबरोबर मला न नेल्यास प्राणत्याग करीन' असें तिनें आपल्या पतीस सांगितलें; परंतु तिची कोणतीच विनवणी रामचंद्र मान्य करीनात व अरण्यांत माझे एकट्याचेंच संरक्षण होणें कठीण तर तुला माझ्याबरोबर नेऊन काय करूं ? तुझें रक्षण कसें होणार व कोण करणार असें ते सीतामाईला म्हणाले. साध्या विनवण्यांनीं आपल्या पतीचें मन वळत नाहीं हें पाहून सीतामाई बेचैन झाली व आपल्या पतीचें मन कसें वळेल याचा ती विचार करूं लागली.

सीतामाई ही मुळचीच मोठी बुद्धिमान् असल्यामुळें त्या प्रसंगाला उपयोगी पडेल अशी तिला एक युक्ति सुचली व त्या युक्तीचा तिनें अवलंब केला. रामचंद्रप्रभु हे मोठे पराक्रमी होते. त्यांच्या पराक्रमाला जगांत तुलना नव्हती. एकबाणी म्हणून त्यांची सर्वतो-मुखी ख्याती झाली होती. लहानपणीं विश्वामित्राबरोबर असतांना व जनकन्या मंडपांत शिवधनुष्य उचलून त्यांनीं आपल्या पराक्रमाचा व शक्तीचा स्वतः अनुभव घेतला होता. अशा पराक्रमी पुरुषाच्या पराक्रमाला कमीपणा आणणारी कोणतीही गोष्ट ती कधींही घडूं देणार नाहीं अशी सीतेची खात्री होती व म्हणून ती रामचन्द्राला म्हणाली, 'अरण्यांत आपल्या पत्नीचें संरक्षण करण्याला लागणारें शौर्य व धैर्य हीं रामचन्द्रामध्यें नाहींत असें जर जनक राजाला कळलें तर आपला जावई हा पुरुषवेषधारी स्त्रीच होता, त्याला आपण मुलगी देण्यांत मोठी चूक केली असें तो म्हणेल व तुमच्या कीर्तीला काळीमा लागेल, याबद्दल मला अत्यंत वाईट वाटतें.'

किं त्वाऽमन्यत वैदेहः पिता मे मिथिलाधिपः
रामजामातरं प्राप्यस्त्रियं पुरुषविग्रहम् ॥ ३ ॥

( अयोध्याकांड सर्ग ३० श्लोक नंबर ३ )

'**अर्थः**—हे राम ! पुरुषरुप धारण करणारा आणि वस्तुतः स्त्री असलेला जामात मिळाल्यानें माझ्या मिथिलाधिप पित्याला अर्थात् जनकराजाला काय बरें वाटेल ?'

सीतेच्या या युक्तिवादाच्या बोलण्याचा योग्य तो इष्ट परिणाम झाला व आपल्या तोंडून निघालेला शब्द कधींही मार्गे न घेणारे एकवचनी राम पूर्वी ज्या सीतेला तूं माझ्याबरोबर येऊं नको म्हणाले त्याच सीतेला तूं माझ्याबरोबर ये असें म्हणाले. वरील एकंदर विवेचनावरून वनामध्यें भयंकर संकटें सोसावीं लागणार हें ठाऊक असतांनाही तेथें जाण्याची तयारी दाखवून रामचंद्राबद्दलचें तिनें दाखविलेलें पतिप्रेम तिच्या मनाचा खंबीरपणा व तिची असामान्य बुद्धिमत्ता हे गुण या कांडांत प्रामुख्यानें दिसतात.

---

—गेल्या ( मे ) श्री साई लीलेच्या अंकांत पान ३७ वर 'देणगीचा साभार स्वीकार' या मथळ्याखालीं प्रसिद्ध झालेल्या मजकुरांत देणगीदार सौ. सुमित्राबाई यांचें नांव केवळ चुकीनें सौ. सुमतीबाई असें छापलें गेलें आहे, तरी त्याऐवजीं सौ. सुमित्राबाई असें वाचावें अशी विनंती आहे.

---

## नवीन प्रकारचें 'बाबां'चें पाणचित्र

'श्रीबाबां'च्या भक्तांकडून नव्या नव्या कल्पनांनीं चित्रें करण्याचे जे प्रयत्न होतात, त्यांतील एक अभिनव प्रयत्न आमच्याकडे अभिप्रायार्थ आला आहे. पूर्वी जपानी 'पाणचित्रें' ( Water-Pictures ) पुस्तकांवर चिकटविण्यासाठीं येत असत. त्याच शास्त्रीय सिद्धांतावर आधारलेलें हें 'बाबां'चें पाणचित्र कांच, धातू, लाकूड, प्लॅस्टिक, किंवा कोणत्याहि वस्तूवर कायम उमटवितां येतें.

एकदां पाण्यानें आरसा, तिजोरी ( कॅशबॉक्स ), कपाट, देव्हारा, यांवर हें पाणचित्र उमटवलें कीं तें 'ऑइलपेंटिंग'च असल्यानें, पाण्यानें किंवा धुतल्यानें खराब होत नाहीं. वर्षानुवर्षें टिकून राहण्यासारखें हें पाणचित्र मुंबईच्या 'क्रोमोप्रिंट'नें तयार केलें आहे. तें करवून घेणारे साईभक्त श्री. बापूसाहेब करंदीकर यांची कल्पना अभिनंदनीय आहे. प्रचारासाठीं याची किंमत अति अल्प म्हणजे वीस नये पैसे ठेवण्यांत आली आहे.

[ एकमेव विक्रेते ! **विश्वनाथ अँड कं.**, नोबल चेंबर्स, पारसी बझार स्ट्रीट, मुंबई १ ]

---

# रमण महर्षींचा प्रसाद

**शिष्यः**—अध्यात्मिक अनुभवांपैकीं सर्वांत महत्त्वाचा असा अनुभव कोणता ?

**महर्षि रमणः**—आत्म प्रचीति. स्वतःची ओळख पटणें.

**शिष्यः**—विवाहित मनुष्याला आत्मानुभव घेतां येणें शक्य आहे का ?

**महर्षिः**—निश्चित. मनुष्य विवाहित असो वा अविवाहित असो; कोणतीही स्थिति आत्मप्रचीतीआड येऊं शकत नाहीं. प्रचीती व्यायची ती येथें व याच जन्मीं. तसें नसतें व केव्हां तरी कोणत्या ना कोणत्या प्रयत्नांच्या सहाय्यानें तें साध्य गांठावयाचें असतें तर त्यामागें लागण्यांत मोठेंसें महत्त्व नव्हतें.

**शिष्यः**—मिठाची बाहुली समुद्रांत पोहत असली व तिच्या अंगावर वाटरप्रुफ कोट असला तरीही तिचें संरक्षण होणार नाहीं. ती वितळून जावयाची. या जगांत रोजच्या रोज माणसाला धडपडावें लागतें. आणि हें जग तर एखाद्या महासागरासारखें आहे.

**महर्षिः**—होय, शरिरांतील मन हेंही वॉटरप्रूफ कोटासारखें आहे.

**शिष्यः**—माणूस कामांत गुंतलेला आहे व त्याला कशाचीही इच्छा नाहीं; मग त्याला शांतता लाभेल का ? रोजच्या जीवनांत त्याला जीवन कलहास तोंड द्यावें लागतें. ध्यान धारणेला त्याला वेळच मिळत नाहीं. प्रार्थना करण्यापुरतीही त्याला फुरसत नसते.

**महर्षिः**—खरें आहे. कांहींतरी इच्छा, अपेक्षा बाळगून केलेल्या कामामुळें माणूस बंधनांत सांपडतो; परंतु निरिच्छ राहून केलेल्या कामामुळें तो बंधनांत सांपडत नाहीं; कार्य करीत असतां त्याचें मन खालीवर होत नाहीं. तो तोल सांभाळूं शकतो. मनाची शांतता राखूं शकतो. आपल्या कर्तव्यपालनांत गढून जाणें हाच देवाला केलेला खराखुरा नमस्कार होय...आणि भगवंताला आपल्या हृदयांत सिंहासन करून देणें हेंच खरें आसन होय.

**शिष्यः**—त्यासाठीं मी घरादाराचा त्याग करायला नको का ?

**महर्षिः**—तेंच जर दैवांत लिहिलें असेल तर हा प्रश्नच उद्भवत नाहीं.

**शिष्यः**—मग ऐन तारुण्यांत तुम्हीं आपल्या घरादाराचा त्याग कां बरें केला ?

**महर्षिः**—दैवांत जसें असेल, भगवंतानें जसा निर्णय घेतलेला असेल तसेंच घडून यावयाचें. त्याच्या इच्छेपुढें कोणाचेंही चालू शकत नाहीं. आम्हीं काय करायचें किंवा आमचें काय व्हायचें, हें प्रारब्धानें निश्चित करुन टाकलेलें असतें.

**शिष्यः**—आत्मारामाच्या शोधासाठीं मी माझा सर्व वेळ खर्च करावा हें योग्य आहे काय ? आणि तसें करणें शक्य नसल्यास मी स्वस्थ बसावें काय ?

**महर्षिः**—कोणत्याही गोष्टीच्या मागें न लागतां स्वस्थ बसून रहातां येत असेल तर ठीकच आहे; परंतु ते जर शक्य नसेल तर आत्मप्रचीतीचा प्रश्न

उद्भवतो त्यावेळीं स्वस्थ बसून रहाण्यांत फायदा कोणता? मनुष्याला जोंपर्यंत धडपडावें लागत आहे, जीवन संग्राम करावा लागत आहे; तोंपर्यंत त्यानें आत्मप्रचिती-साठीं जरुर ते प्रयत्न करण्याचें सोडून देतां कामा नये.

**शिष्य :** मोक्षासंबंधींच्या योजनेंत गृहस्थाचें स्थान कोणतें? मोक्षाची प्राप्ती व्हावी यासाठीं माणसानें गृहस्थाश्रमाचा त्याग करून संन्यासी वैरागी बनणें जरूर नाहीं का?

**महर्षि :** तुम्हीं गृहस्थ आहांत या नात्यानें विचार कां करतां? तुम्हीं संन्यास घेतला तरी संन्यासासंबंधीचे विचार तुमची पिच्छा पुरवितील. तुम्हीं गृहस्थाश्रम स्वीकारून संसारांत राहिलां किंवा त्याचा त्याग करून जंगलाचा मार्ग स्वीकारला तरी तुमच्या मनाची मगरमिठी कांहीं तुम्हांला मोकळा सोडीत नाहीं. अहंकार हा नाना विचारांस जन्म देणारा आहे. शरिरांत व जगांत त्यानें आपला पसारा पसरविलेला आहे. तोच मी गृहस्थ आहे याची तुम्हांला जाणीव देत रहातो. त्याचा ( गृहस्था-श्रमाचा ) त्याग केला तर त्याच्या जागीं संन्यासासंबंधीं विचार येऊन बसेल. संसाराच्या वातावरणांतून जंगलाच्या वातावरणांत किंवा कुठेंहि जा; मानासिक अडचणीचा डोंगर तेथें हजर असणारच. नवीन वातावरणांत त्यांची अधीकच वाढ होणार. सभोंवारची परिस्थिति बदलण्यानें काय होणार आहे? तुमच्या मार्गांत मुख्य धोंड आहे ती मनाचीच. संसारांत वावरा कीं जंगलांत वावरा, त्या मनावर ताबा मिळवितां आला पाहिजे. तें कार्य तुम्हीं अरण्यांत जाऊन करणार म्हणतां मग संसारांत राहून कां नाहीं? मग सभोंवारचें वातावरण बदलण्याची काय बरें जरूरी? तुम्हांला त्यामार्गानें जावयाचें आहे व त्यासाठीं प्रयत्न करावयाचे आहेत तर आतांच कां करीत नाहीं? सभोंवारचें वाता-वरण असेना का कोणत्याही प्रकारचें.

**शिष्यः**—जगाच्या व्यवहारांत वावरत असतां समाधि सौख्य घेता येणें शक्य आहे काय?

**महर्षिः**—'मी कार्य करतों' ही जाणीवच अंतराय आणणारी आहे. 'कार्य करणारा कोण?' असा प्रश्न तुम्हीं स्वतःला विचारा—तुम्हीं कोण अहांत, याची सतत जाणीव ठेवा. म्हणजे कार्यांमुळें वाट्यास येणारें बंधन तुम्हांला चिकटणार नाहीं. आप भोगानें आपो-आप कार्य होत राहील. कार्य करण्यासाठीं किंवा कार्यत्याग करण्यासाठीं मुळींच धडपड करूं नका. त्यासाठीं कांहीं एक प्रयत्न करूं नका. त्या प्रयत्नांमागें लागणें, हें एक बंधनच आहे. तुम्हीं कितीही धडपड केली तरी जें घडावयाचें तें घडून येणारच. तुम्हीं काम करायचें नाहीं असें तुमच्या दैवांत असल्यास तुम्हीं कितीही आटापीट केली तरी कामकाजाशीं तुमचा संबंध येऊं शकणार नाहीं. आणि तुम्हीं अमूक काम करायचें हे तुमच्या दैवीं असल्यास तुम्हांला तें टाळतां येणार नाहीं. तें तुम्हांला करावेंच लागेल. तेव्हां ती जी महान शक्ती तिच्या वर सर्व सोपवून तुम्हीं स्वस्थ रहा. तुम्हीं तुमच्या मर्जीनुरुप एखाद्या कार्याशी संबंध जोडूं शकत नाही किंवा त्याचा त्यागही करूं शकत नाहीं, तुमचा नव्हे तो प्रांत

———

# माझा वेदांत

एकदां स्वामी विवेकानंद यांच्याजवळ बसून वेदान्तासंबंधीं चर्चा करावी या हेतूनें एक गृहस्थ आले. त्यावेळीं पंजाबमध्यें भयंकर दुष्काळ पडलेला होता. जनतेची उपासमार चालू होती. त्या भागांतून आल्यामुळें स्वामीजींनीं त्यांच्याजवळ दुष्काळ-पीडितांसाठीं कोणकोणती व्यवस्था करण्यांत आली आहे, सरकार व पुढारी त्याबाबतींत काय काय करीत आहेत याचीहि चौकशी केली आणि या चर्चेंत बहुतेक सारा वेळ खर्च झाला.

स्वामीजींचा निरोप घेऊन जातांना ते सद्गृहस्थ मला म्हणाले, 'मी आलों होतों आपल्याबरोबर वेदांतासंबंधीं चर्चा करण्याच्या हेतूनें; परंतु सारा वेळ खर्च झाला दुष्काळासंबंधीं चर्चा करण्यांत! काय करणार!

यावर स्वामीजी गंभीरतापूर्वक म्हणाले, 'बाबारे! जोपर्यंत माझ्या देशांतील दरेक व्यक्ति काय, परंतु कुत्रासुद्धां उपासमारीमुळें तडफडत असेल तोंपर्यंत, त्यांच्या पोटापाण्याची सोय लावणें हा माझा पहिला वेदान्त! त्याचा अंत लागल्यानंतर इतर वेदान्ताच्या गोष्टी!

**— विवेकानंद चरित्र**

दुःखाच्या व आपत्तीच्या प्रसंगीं कणखर बना व सुखाच्या प्रसंगीं नम्र व्हा. सुखांत काय किंवा दुःखांत काय, समतोलपणा गमावूं नका. एखाद्याशीं, फाजील किंवा जरूरीपेक्षां अधिक सलगी ठेऊं नका किंवा कोणाशीं तुसडेपणानेंही वागूं नका. दोन्हीं दुर्गुण आहेत. ह्यां त्यांमधील सुवर्णमध्य साधण्याकडे नेहमी लक्ष ठेवा म्हणजे सुखी व्हाल.

**— महर्षि वाल्मिकी**

एक सज्जन गृहस्थ मोठा पुण्यशील होता. त्याचा हात नेहमीं उंच असे. कोणी अडचणींत सांपडलेला येईल त्याला शक्तिनुसार द्यायचा; परंतु ज्याला द्यायचा त्याच्याकडे वर मान करून तो पहात नसे. एका गृहस्थाच्यानें रहावेना. त्यानें विचारलें, "काय हो! तुम्हीं दानधर्म करतां पुष्कळ; परंतु देतांना डोळे खालीं का? घेणाऱ्याचा चेहरा न पाहिल्यामुळें तुम्हीं कोणाला ओळखीत नाहीं व कित्येक लोक दोन वेळांही घेऊन जातात!"

यावर तो परोपकारी सज्जन म्हणतो, "मी डोळे वर करुन कशाला पाहूं? मी देणारा कोण? आणि माझें आहे काय? देणारा तो भगवान्! तो पाहून घेईल. मी केवळ निमित्तमात्र. असें असतां लोक मला दाता म्हणतात व त्याची लाज वाटून मी खालीं पहातों!"

एक डुबकी मारून रत्न हातीं लागलें नाहीं म्हणून समुद्राला रत्नहीन मानूं नको. बुड्या मारतां मारतां रत्न हातीं लागलेच लागेल. थोड्याशा समाधानानें 'मला ईश्वर प्राप्ति होत नाहीं' असें मानून हताश होऊं नको. धैर्य व चिकाटीपूर्वक नामस्मरण चालू ठेव. योग्यवेळीं देव तुझ्यावर कृपा करील व व तुझी मनकामना पूर्ण करील.

**— श्रीरामकृष्ण**

# श्री साईबाबांची भक्ति

लेखक : आप्पाराव

**मात्र माझें करा स्मरण। विश्वासयुक्त अंतःकरण**
**ठेवा, करा निष्काम भजन। कृतकल्याण पावाल॥**

—श्री साईसच्चरित

श्री साईबाबा समाधिस्थ होऊन सुमारें बेचाळीस वर्षांचा काळ मागें पडलेला आहे. आणि एवढ्या या दीर्घकाळा नंतरही त्यांचें पुण्यस्मरण, भक्ति, भजन जनतेला तारक, पोषक व कल्याणप्रद होऊन राहिलें आहे. आपल्या ह्यातींत आपले निस्सिम भक्त सुखी व्हावेत, त्यांची मनकामना पूर्ण व्हावी व त्यांच्याकडून सत्कार्यें घडावीं यासाठीं ते झटत असत. आज प्रत्यक्ष देहानें ते आमच्यांत वावरत नसले, तरीही त्यांचें ते कार्य अखंडित चालू आहे. जनमनावर त्यांचा जो पगडा बसलेला आहे तो उगाच नाहीं. बाबा हें जागतें दैवत आहे. जो जो त्यांची आठवण करील, जो जो त्यांची अंतःकरणापासून भक्ति करील, जो जो त्यांच्याठायीं निस्सीम श्रद्धा भाव ठेऊन वागेल, त्याचें कोटकल्याण झाल्याशिवाय रहाणार नाहीं. पाहिजे अखंड स्मरण, श्रद्धा व भक्ति.

**संकटप्रसंगीं बाबा—**

आजकाल आम्हीं देवाची किंवा बाबांची आठवण करतों ती संकटसमयीं. अंतःकरणांत भक्तीचा ओलावा जागा होऊन शिरडीला धांव घ्यावीशी वाटते ती अडीअडचणीच्यावेळीं. तरीही बाबा तुमच्या भक्तिभावाचें फळ तुमच्या पदरांत टाकल्याशिवाय रहात नाहींत.

आम्हीं सारेजण तात्पुरत्या सुखाकडे व फायद्याकडे पहाणारे आहोंत. आमच्या भजन पूजनांत व पाठांतरांत कांहीं ना कांहीं हेतु हा असतोच. निष्काम भजन पूजन करणारे फार थोडे. आणि ज्यांच्या वाट्यास निष्कामवृत्तीचें भाग्य आलें ते धन्य होत.

सकाम भक्ति करतां करतां तरी आम्हीं पायरी पायरीनें निष्काम भक्तिकडे वळलें पाहिजे. भक्तिभावांत सातत्य, अखंडितपणा संभाळला पाहिजे. हा अखंडितपणा सांभाळणें म्हणजे काय ! श्री साईबाबांची भक्ति करायची व ती सतत चालू ठेवायची म्हणजे काय ? आमच्या देहांत अनेक दुर्गुणांनीं कायमचें घर केलें आहे. आमचा स्वार्थ तेवढा आम्हांला दिसतो. तो दिसावा, परंतु त्याच बरोबर इतरेजनांच्या सुखाचा आम्हांला विसर न पडावा-आपल्याकडून दुसऱ्याच्या उपयोगीं पडण्यासाठीं जें जें करता येण्यासारखें असेल तें तें करण्याकडे आमचें लक्ष स्वयंस्फूर्तीनें वळलें पाहिजे. मी माझें कल्याण साधीन, परंतु त्याच बरोबर इतरेजनांच्या कल्याणासाठीं शक्य त्या परीनें झटेन, ही भावना मनांत सदैव जागृत राहिली पाहिजे.

**इतरांचेंही कल्याण दिसावें**

आमची दृष्टि आज अत्यंत आकुंचित आहे, ती दूरवर फांकली पाहिजे. आमचें कल्याण तेवढें आम्हांला दिसतें. त्याचबरोबर इतरांचेंही दिसलें पाहिजे! बाबाकडे लक्ष लावायचें म्हणजे बाबांचें जसें दीन दुबळयांकडे व दुःखितांकडे नेहमीं लक्ष लागून राहिलेलें असे तोच कित्ता आम्हीं गिरविला पाहिजे. म्हणजे आमच्यांत माणुसकी आली पाहिजे. रोज दुसऱ्यांच्या उपयोगी पडण्याचे कितीतरी मोके येतात. मनांत आणिलें तर दुसऱ्यांसाठीं आम्हीं कांहीं ना कांहीं करूं शकतों; परंतु दुर्दैवानें तशी बुद्धीच होत नाहीं आपल्याला!

तोच बाबांचा आवडता भक्त होऊं शकेल व त्याच्यावरच बाबांची कृपादृष्टि वळूं शकेल कीं जो परदुःख शीतळ न मानतां तें दुःख दूर करण्यासाठीं झटेल व त्यासाठीं पुढें सरसावेल.

बाबा नवसास पावावे म्हणून आपण नवसखायास करतों; परंतु भलत्यासलत्याच्या नवसास बाबा कसे पावतील! जशी श्रद्धा तसें फळ. तूंच माझें सर्वस्व. तुझ्याशिवाय माझा त्राता दुसरा कोणी नाहीं, अशा तळमळीनें, अंतःकरणपूर्वक केलेली प्रार्थना त्यांना पोहोंचते.

**बाबांना आवड कशाची!**

आम्हीं शिरडीची यात्रा करतों. केलेले नवस फेडतों; श्री साई सच्चरिताचीं पारायणें करतों; गोड गोड नैवेद्य दाखवितों. हे अशाप्रकारचे सारे बाह्योपचार आपण करतों; परंतु त्यांत आपलें अंतःकरण असतें का! बाबांना तुमचे डामडौल व दिखाऊपणा नको. बाबांना तुमचें अंतःकरण पाहिजे. बाबांना तुमचें सदाचरण पाहिजे. बाबांना तुमची सच्छीलता पाहिजे.

बाबांची सेवा म्हणजे मानवसेवा. बाबांची खरीखुरी भक्ति म्हणजे माणुसकीचें आचरण. आपल्या कृपेचा प्रसाद कोणाला मिळतो! कोणत्या गोष्टींवर आपण निश्चयत खूष आहोंत व कोणत्या गोष्टी केल्या असतां आपण प्रसन्न होतों हें बाबांनीं स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे.

> **आल्यागेल्याचा आदर करीं। तृषितां जल भुकेल्या भाकरी।**
> **उघड्यास वस्त्र बसाया ओसरी। देतां श्रीहरी तुष्टेल॥**

या माणसाच्या मामुली व सर्वसाधारण गरजा झाल्या. आज जगांत जें तांडव चालू आहे, ज्या चढाओढी, हालचाली व उपद्व्याप चालू आहेत, ते कशासाठीं? पोटभर अन्न मिळावें, अंगभर वस्त्र मिळावें व रहायला आसरा मिळावा, यासाठीं या जिवाच्या साऱ्या आटापिटी! सारें राजकारण या तीन गोष्टींत सामावलेलें आहे. यासाठीं युद्धें, तंटे, भांडणें, कापाकापी, वितंडवाद चालू आहेत.

**साऱ्या आटापिटी कशासाठीं!**

सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतां वादविवाद व झगडे होतात ते या तिन्हीं गोष्टींसाठीं

किंवा त्यांपैकीं एखाद्या गोष्टीसाठीं. आज जगांत सुखी कोण! ज्याच्याजवळ भरपूर अन्नवस्त्र व जागा आहे. या जगांत बहुसंख्य लोकांपाशीं यांपैकीं एक आहे वर दुसरें नाहीं किंवा तिन्हींही नाहींत; आणि म्हणून तीं दुःखी कष्टी!

समाजांतील ह्या दुःखीकष्टीपणा जावा यासाठीं हस्तें, परहस्तें झटणें, जरूर त्या साधनाच्या अभावीं होणारे कष्ट आपल्या हातून होतील तेवढे कमी करणें व आपल्या शक्तीप्रमाणें जे जे आपल्या सान्निध्यांत येतील त्यांच्या सुखासाठीं व आनंदासाठीं झटणें, हीच बाबांची खरीखुरी पूजा व सेवा होय.

तुम्हीं बाबांच्या चरणीं काय काय वाहिलें यापेक्षां तुम्ही दुःखितांचें दुःख कमी करण्यासाठीं त्यांच्या जीवनांत आनंदाचा ओलावा आणण्यासाठीं व त्यांचें दैन्य निवारण करण्यासाठीं किती झटलां, याकडे बाबांचें लक्ष बारकाईनें असतें. दुसऱ्यांचें दुःख दैन्य दूर करण्यासाठीं झटणें हा मानवधर्म आहे. परंतु नेमके त्याच धर्माला आम्हीं पोरखे झालेले आहोंत. श्री साईबाबा काय किंवा आजवर होऊन गेलेले थोर संत महात्मे काय, याच मानव धर्मावर अर्थात् माणुसकीवर सर्व जोर देत आलेले आहेत. आणि या मानवतेची, माणुसकीची पूजा–तिचें अहर्निश आचरण म्हणजेच श्री साईबाबांचें भजन–पूजन.

अशा रीतीनें जे श्रीसाईबाबांचें पूजन अर्चन करतील त्यांचें कोडकौतुक पुरविल्याशिवाय व त्यांचें कोटकल्याण केल्याशिवाय, ते केव्हांही रहाणार नाहींत. तेंच तर त्याचें ब्रीद आहे व त्यासाठींच त्यांचा अवतार आहे.

**जो मजलागीं अनन्य शरण। विश्वासयुक्त करी मत्भजन।**
**माझें चिंतन, माझें स्मरण। तयाचें उद्धरण ब्रीद माझें॥**

---

एकदां स्वामी विवेकानंद यांनीं गांवोगांव फिरून धार्मिक विचारांचा फैलाव व जनतेंत जागृति घडवून आणण्याची आपले एक सहकारी विरजानंद यांस विनंती केली. त्यावेळीं मोक्षासाठीं ज्यांची धडपड चाललेली होती असें विरजानंद म्हणाले, 'मोक्षासाठीं मला अजून कांहीं साधना करावयाची आहे, ती मला पूर्ण तरी करूं द्या.'

हें उत्तर ऐकून स्वामी विवेकानंद गर्जून म्हणाले, 'मोक्ष अधिकाराशिवाय मिळवितां येत नाहीं. मोक्षासाठीं नर्कवासांत जावें लागेल. मोक्षपदाची तळमळ लागली असेल तर दुसऱ्यांची सेवा करा. सेवा करतां करतां संकटांचा वर्षाव झाला तरी त्यांचें स्वागत करा. स्वार्थबुद्धीनें वागून स्वर्ग किंवा मोक्ष मिळविण्यापेक्षां परमार्थासाठीं सहन केलेल्या संकटांनीं तुमच्यासाठीं मोक्षाचें द्वार खुलें होणार आहे.

**— स्वामीजींचें चरित्र**

प्रत्येक मनुष्याला कांहीं ना कांहीं महत्वाकांक्षा असते, असें म्हणतात. माझी मात्र एकच महत्वाकांक्षा आहे व ती म्हणजे मी सर्वांच्या आदरास पात्र व्हावें हीच.

**— लिंकन**